- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३९ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

# आम्ही देऊ तो निर्णय भविष्यात लागू होईल



## शिवसेना पक्ष प्रकरणी सुप्रीम कोर्टाची टिप्पणी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली-मुंबई**

शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांनी पुन्हा एकदा विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळे असल्याचा मुद्दा मांडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या २०२२ च्या बंडानंतर १० व्या सूचीनुसार आमदारांना अपात्र करणे गरजेचे होते, असा युक्तिवाद केला. या युक्तिवादानंतर कोर्टाने आम्हाला अपात्रता ठरवायची आहे. आम्ही देऊ तो निर्णय भविष्यासाठी लागू होईल, अशी टिप्पणी सुप्रीम कोर्टाने केली.

बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षाची नियुक्ती केली असली तरी १९८९ साली आमचा पक्ष राजकीय पक्ष म्हणून नोंद झाला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधननंतर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. यावेळी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आली होती. संघटना स्तरावर उद्धव ठाकरेंकडे बहुमत होते. आमच्याकडून निवडणूक आयोगात सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या होत्या, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

### विधिमंडळ पक्षातील फूट राजकीय मानायची का ?

विधिमंडळ स्तरावर शिंदेंकडे बहुमत होते. पण शिंदे पक्षाच्या घटनेत बदल करू शकत नाहीत. त्यांना तसे अधिकार नव्हते, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. विधिमंडळ पक्षात पडलेली फूट ही राजकीय पक्षाची फूट मानायची का, असा सवाल कपिल सिब्बल यांनी केला.

### निवडणूक आयोगावर सिब्बल यांचे ताशेरे

कार्यक्षेत्रात नसलेले निर्णय निवडणूक आयोगाने घेतले. आमचा पक्ष, आणि चिन्ह घेतले आणि सरकारही बनवले. पक्ष कुणाचा हे निवडणूक आयोगाने ठरवले. त्यांना चिन्ह दिले. आमदार अपात्रतेचा निर्णय तेव्हा घेणे गरजेचे होते. आम्ही २३ तारखेला अपात्रतेची याचिका दाखल केली. १७ फेब्रुवारीला निवडणूक आयोगाने शिंदे गटाला चिन्ह दिले, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

### आम्हाला आमदार अपात्रता ठरवायचीय

निवडणूक आयोगाने विधिमंडळातील बहुमत पाहून निर्णय दिला, असे कपिल सिब्बल म्हणाले. यावेळी कपिल सिब्बल यांनी सुभाष देसाई यांच्या केसचा उल्लेख केला. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर कोर्टाने टिप्पणी केली. आम्हाला आमदार अपात्रता ठरवायची आहे. आम्ही निर्णय देऊ तो भविष्यासाठी लागू होईल, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले.

### शिंदे यांनी स्वत: २०१८ च्या घटनेत बदल केला

या संदर्भात सिब्बल म्हणाले, "शिंदे यांनी स्वतः २०१८ च्या घटनेत बदल केला आणि आता ती घटना अस्तित्वातच नाही असा युक्तिवाद करत आहेत." शिंदे गटाची ही भूमिका केवळ विसंगतच नाही, तर राजकीय पक्षाच्या अंतर्गत लोकशाहीची पायमल्ली करणारी आहे. १९९९ च्या घटनेचा आधार घेऊन २०१८ ची दुरुस्ती अवैध ठरवणे, ही एक कायदेशीर खेळी असून त्याकडे दुर्लक्ष करून निवडणूक आयोगाने निर्णय घेणे अयोग्य असल्याचे सिब्बल यांनी सांगितले. पक्षावर कोणाचे वर्चस्व आहे हे ठरवताना निवडणूक आयोगाने वापरलेले निकष सिब्बल यांनी खोडून काढले. त्यांनी अत्यंत महत्त्वाचा तांत्रिक मुद्दा उपस्थित केला की, निवडणूक आयोगाला पक्षामध्ये 'निवाडा करण्याचा अधिकार' नाही. दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निकालाचा हवाला देत त्यांनी स्पष्ट केले की, आयोगाला केवळ पक्षाची 'मान्यता काढून घेण्याचे' अधिकार आहेत. पक्षाच्या अंतर्गत बहुमताबाबत सिब्बल यांनी आकडेवारी मांडली की, राष्ट्रीय कार्यकारिणीत उद्धव ठाकरे यांच्याकडे १६० विरुद्ध शून्य असे प्रचंड संख्याबळ होते. तरीही विधीमंडळातील बहुमताच्या जोरावर निवडणूक आयोगाने संपूर्ण पक्षच शिंदे गटाच्या हवाली केला.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरक्षेत चूक

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हवाई सुरक्षेत मोठी चूक घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ट्रम्प यांना घेऊन जाणारे अमेरिकेचे अतिमहत्त्वाचे मरीन वन हेलिकॉप्टर वॉशिंग्टन डीसीच्या आकाशात एका कमर्शियल जेटच्या अत्यंत जवळ आल्याची खळबळजनक घटना घडली. या दोन्ही विमानांमधील अंतर धोक्याच्या पातळीपर्यंत कमी झाल्यामुळे मोठी दुर्घटना होता होता टळली असून याप्रकरणी आता फेडरल एविएशन एडमिनिस्ट्रेशनने उच्चस्तरीय तपास सुरू केला आहे.

मंगळवारी दुपारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना घेऊन एका मिलिट्री हेलिकॉप्टरने व्हाईट हाऊसजवळून उड्डाण केले. दरम्यान, एअर ट्रॅफिक कंट्रोलरच्या चुकीमुळे उत्तर व्हर्जिनियाच्या रोनाल्ड रीगन नॅशनल एअरपोर्टवरील कमर्शियल उड्डाणे वेळेत रोखता आली नाहीत. याचदरम्यान, फ्लोरिडाच्या दिशेने जाणारे एक पॅसेंजर जेट आणि राष्ट्रपतींचे मरीन वन हेलिकॉप्टर एकमेकांच्या अत्यंत जवळ आले. या लॉस ऑफ सेपरेशन घटनेमुळे विमानतळावरील सुरक्षा यंत्रणांची झोप उडाली आहे.

## पाकमध्ये हिंसाचार, बहिष्कारानंतरही ५६ टक्के मतदान

**वृत्तसंस्था, रावलकोट**

पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून मोठा उठाव सुरु आहे. आंदोलकांवर गोळाबार केला जात आहे, मोठ्या प्रमाणावर आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत, अशातच पाकिस्तानने या भागात निवडणूक घेतली आहे. एवढी आंदोलने आणि हिंसाचार होऊनही पीओकेमध्ये सत्ताधारी नवाज शरीफ यांच्या पक्षाला सत्तेत बसण्याची संधी मिळण्याचे संकेत आहेत.



पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीर मधील विधानसभा निवडणुकीत पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाज या पक्षाने मुसंडी मारली आहे. पहिल्या दोन टप्प्यांतील ३४ पैकी २४ जागांवर दणदणीत विजय मिळवत पीएमएल-एम ने सत्ता स्थापनेच्या दिशेने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. पाकिस्तानने निर्बंध लादलेली संघटना जॉइंट अवामी अ‍ॅक्शन कमिटीने निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करूनही स्थानिक नागरिकांनी मोठया संख्येने मतदानात सहभाग नोंदवला व ५६ टक्के मतदान केले आहे.

### ३ टप्प्यांत निवडणूक; १० ऑगस्टला अंतिम टप्पा

सुरक्षेची कारणे आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पीओके मधील निवडणुका ३ टप्प्यांत घेतल्या जात आहेत. पहिला व दुसरा टप्प्यात ३४ जागांवर मतदान आणि मतमोजणी पूर्ण झाली आहे, ज्यामध्ये पीएमएल-एन ने २४ जागांवर विजय मिळवला आहे. उर्वरित ११ जागांसाठी १० ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे. अनेक भागात ५० टक्क्यांहून अधिक, तर राजधानी मुझफ्फराबादमध्ये ५६ टक्क्यांहून अधिक मतदान झाले.

### हिंसाचार, हिंसक चकमकी, बहिष्काराचे सावट

निवडणूक प्रचारादरम्यान जेएएसी या संघटनेने सातत्याने निदर्शने केली आणि जनतेला मतदानावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले. कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत प्रांतीय सरकारने या संघटनेवर बंदी घातली होती. मतदानापूर्वी आंदोलक आणि पोलिसांमध्ये अनेक ठिकाणी हिंसक चकमकी झाल्या, तरीही नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला.























जाहिरात संकलन : श्री . राजु फुंडे - दैनिक सिंहवाणी वृत्त, सालेकसा तालुका प्रतिनिधी

दैनिक सिंहवाणी वृत्त

Epaper : epaper.sinhvani.com

दिनांक : शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६

संपादकीय लेखणीतून...

# जर्सीचा रंग

सध्या हॉकी इंडियामध्ये जर्सी वाद पराकोटीला पोहोचला आहे. भारतीय हॉकी संघाच्या जर्सीचा रंग बदलण्यावरून हॉकी इंडियामध्ये सुरू झालेला अंतर्गत वाद मंगळवारी अधिक तीव्र झाला. जर्सीचा रंग बदलण्याचा निर्णय कसा घेण्यात आला, याचे स्पष्टीकरण आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्यासाठी भारतीय हॉकी महासंघाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी दिलेली मुदत कार्यकारी संचालक कमांडर आर. के. श्रीवास्तव यांनी पाळली नाही. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर विचारविनिमय करण्यासाठी सरचिटणीस भोलानाथ सिंह यांनी कार्यकारी मंडळाची (ईबी) तातडीची बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. तिर्की यांनी श्रीवास्तव यांना कडक ई-मेलमध्ये सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले होते. यापूर्वी श्रीवास्तव यांनी कार्यकारी मंडळाला दिलेले स्पष्टीकरण अपुरे असल्याचे सांगत तिर्की यांनी पुरावे सादर करण्याचे निर्देश कायम असल्याचे स्पष्ट केले. मात्र, दिलेल्या मुदतीत श्रीवास्तव यांच्याकडून कोणतेही प्रत्युत्तर किंवा कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत, अशी माहिती सूत्रांनी दिली. मुदत संपल्यानंतर लगेचच सरचिटणीस भोलानाथ सिंह यांनी तिर्की यांना पत्र लिहून सर्व प्रलंबित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक आयोजित करण्याची विनंती केली. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या पुरुषांच्या हॉकी विश्वचषकापूर्वी हा वाद उफाळून आला आहे. भारताचे माजी कर्णधार वीरेन रस्किन्हा, अजितपाल सिंह, धनराज पिल्ले आणि परगट सिंह यांनी जर्सीचा पारंपरिक रंग बदलण्यावर आक्षेप घेतला आहे. निळ्या टर्फवर खेळताना खेळाडूंची दृश्यमानता वाढविण्यासाठी हा बदल केल्याचा दावा हॉकी इंडियाने केला असला, तरी हा निर्णय अध्यक्ष किंवा कार्यकारी मंडळाच्या मंजुरीशिवाय घेण्यात आल्याचे तिर्की यांचे म्हणणे आहे. जर्सीच्या वादाव्यतिरिक्त तिर्की यांनी एका अधिकाऱ्याविरोधातील लैंगिक छळाच्या तक्रारींचा पूर्ण चौकशी अहवालही मागवला आहे. तक्रार निवारण समितीची रचना, सदस्यांची पात्रता आणि बैठकांचे स्वाक्षरी केलेले इतिवृत्त सादर करण्याचे निर्देश तिर्की यांनी दिले होते. एप्रिल महिन्यात आलेल्या अनामिक तक्रारीनंतर अनेक महिला खेळाडू आणि अधिकाऱ्यांनी या आरोपाला दुजोरा दिला होता. मे महिन्यात तिर्की यांनी या विषयावर चिंता व्यक्त केली होती आणि जूनमध्ये समिती स्थापन करण्यावर चर्चा झाली होती. परंतु अद्याप कोणतीही समिती स्थापन झालेली नाही.

पुरुष हॉकी विश्वकप २०२६ च्या तोंडावर भारतीय हॉकी वर्तुळातून अत्यंत मोठी आणि वादग्रस्त बातमी समोर आली आहे. भारतीय हॉकी संघाची जागतिक स्तरावर ओळख असणारी पारंपरिक निळी (ब्लू) जर्सी बदलून आता ती पूर्णपणे भगवी (ऑरेंज) करण्यात आली आहे. हॉकी इंडियाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून (ट्विटर/एक्स) भारतीय संघाची ही नवीन भगवी जर्सी जाहीर करताच क्रीडाप्रेमी आणि राजकीय नेत्यांकडून त्यावर अत्यंत तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. भारतीय हॉकी संघाचा माजी कर्णधार वीरेन रस्किन्हा याने या निर्णयावर थेट शब्दांत ताशेरे ओढले असून, काँग्रेस पक्षानेही यावरून केंद्र सरकारला धारेवर धरले आहे. हॉकी विश्वचषक २०२६चे आयोजन ऑगस्ट महिन्यात बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त विद्यमाने केले जाणार आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी हॉकी इंडियाने पुरुष आणि महिला अशा दोन्ही राष्ट्रीय संघांसाठी ही नवीन भगवी जर्सी बाजारात आणली. जर्सीचा रंग बदलल्याचे समजताच रस्किन्हाने सोशल मीडियावर आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. तो म्हणाला, हॉकी इंडियाने गेल्या काही वर्षांत भारतीय हॉकीच्या विकासासाठी निश्चितच कौतुकास्पद काम केले आहे. पण जर्सीचा मूळ रंग बदलण्याचा हा निर्णय अत्यंत लाजीरवाणा आणि अनाकलनीय आहे. भारतीय क्रीडा जगतात आपल्या संघाची ओळख ही नेहमीच मेन इन ब्लू अशी राहिलेली आहे. मी स्वतः अनेक वर्षे अत्यंत अभिमानाने आणि सन्मानाने ती निळी जर्सी परिधान करून देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. जगभरातील चाहतेही भारतीय खेळाडूंना निळ्या रंगातच पाहू इच्छितात. मग अचानक या जर्सीचा रंग भगवा करण्यामागे नेमके काय तर्कशास्त्र (लॉजिक) आहे? असा संतप्त सवाल त्याने केला. जर्सीच्या रंग बदलाचे हे प्रकरण आता केवळ क्रीडा क्षेत्रापुरते मर्यादित न राहता ते राजकीय पटलावरही पोहोचले आहे. काँग्रेस पक्षाच्या नेत्या आणि खासदार प्रियंका गांधी यांनी या वादावर भाष्य करताना केंद्र सरकारवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. त्या म्हणाल्या, खेळाडूंच्या जर्सीचा रंग बदलणे असो किंवा देशाच्या शिक्षण धोरणातून इतिहास बदलण्याचा चाललेला जाणीवपूर्क प्रयत्न असो, सत्तेत बसलेले लोक नेमके काय करत आहेत हे देशातील आजच्या सुजाण तरुणांना स्पष्टपणे समजते आहे. भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघ आता त्यांच्या पारंपरिक निळ्या रंगाऐवजी भगव्या रंगाच्या जर्सीमध्ये खेळताना दिसेल. हॉकी इंडियाने सोशल मीडियावर या नव्या जर्सीचे अनावरण केले आहे. हा रंग शौर्य, त्याग आणि विजयाचे प्रतीक असून खेळाडू आणि सपोर्ट स्टाफच्या सहमतीनेच हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जर्सीच्या या रंगावरून काही माजी खेळाडूंनी प्रश्न उपस्थित करत वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारतीय पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने या वादावर स्पष्ट भाष्य केले आहे. आम्ही या बाहेरील चर्चांकडे अजिबात लक्ष देत नाही. आमचे पूर्ण लक्ष सामन्यावर आणि कामगिरीवर असते. नव्या जर्सीत एक सामना खेळल्यानंतर मैदानात संघातील खेळाडूंना पटकन ओळखणे आणि त्याच्यासोबत समन्वय साधणे अधिक सोपे जात असल्याचे त्याने म्हटले आहे. हा निर्णय संघ, मुख्य प्रशिक्षक आणि प्रशासनाने मिळून घेतलेला तांत्रिक निर्णय आहे. यात कोणताही राजकीय किंवा बाहेरील दबाव नाही असे हरमन म्हणाला. हॉकी इंडियाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, भारतीय हॉकी संघाच्या जर्सीचा रंग बदलण्याची ही पहिलीच वेळ नाही. तांत्रिक आणि गरजेनुसार याआधीही अनेकदा जर्सीचे रंग बदलण्यात आले आहेत. एकूण काय, जर्सी तेरा रंग कैसा? या प्रश्नाचे उत्तर जिसमें मिलाए वैसा असेच दिसते, तेव्हा खेलो इंडिया खूब खेलो असेच म्हणावे लागेल!

# सक्तीच्या धर्मांतरास आळा; अंमलबजावणीत निष्पक्षता राखणे किती शक्य?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्रात सक्तीने, फसवून किंवा आमिष दाखवून केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांना पूर्णपणे चाप लावण्यासाठी राज्य सरकारने तयार केलेल्या ऐतिहासिक 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायद्याला' अखेर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अंतिम मंजुरी मिळाली आहे. जुलै २०२६ च्या अखेरीस हा कायदा अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रसिद्ध करण्यात आला असून, २ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीची मोहर लागल्याचे वृत्त अधिकृतपणे समोर आले आहे. या मंजुरीमुळे आता हा कडक कायदा संपूर्ण महाराष्ट्रात तात्काळ लागू झाला आहे.

मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तत्कालीन गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी हे विधेयक विधिमंडळात मांडले होते, ज्याला दोन्ही सभागृहांनी बहुमताने मंजुरी दिली होती. 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६' या कायद्यातील सर्वात महत्त्वाची आणि वैशिष्ट्यपूर्ण तरतूद आंतरधर्मीय विवाहाशी संबंधित आहे. जर दोन वेगवेगळ्या धर्मांच्या व्यक्तींमध्ये विवाह झाला आणि तो बेकायदेशीर धर्मांतराच्या हेतूने झाल्याचे सिद्ध झाले, तर जन्माला येणाऱ्या अपत्याला त्याच्या आईचा विवाहापूर्वीचा मूळ धर्म मानण्याचा पूर्ण कायदेशीर अधिकार असेल. अशा अपत्याला आई आणि वडील दोघांच्याही कायदेशीर संपत्तीवर दावा सांगण्याचा पूर्ण अधिकार राहील. धर्मांतराच्या वादात मुलांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होऊ नये, हा यामागील मुख्य हेतू आहे. कौटुंबिक वादाच्या प्रसंगी अपत्याचा कायदेशीर ताबा प्राधान्याने आईकडेच सोपवला जाईल. केवळ आणि केवळ दुसऱ्या व्यक्तीचे बेकायदेशीर धर्मांतर करण्याच्या सुप्त हेतूनेच केलेला विवाह कौटुंबिक न्यायालयाद्वारे रद्दबातल घोषित केला जाऊ शकतो.

**गुन्ह्याचे स्वरूप आणि शिक्षेची विभागणी:**

हा कायदा बेकायदेशीर धर्मांतराला अत्यंत गंभीर श्रेणीत ठेवतो.राज्यात कोणाचेही ऐच्छिक स्वातंत्र्य हिरावून घेऊन केलेले धर्मांतर हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा मानला जाईल. बळजबरीने, धमकावून, फसवणूक करून किंवा लग्नाचे खोटे आमिष दाखवून धर्मांतर केल्यास दोषीला ७ वर्षांपर्यंतच्या कठोर कारावासाची आणि १ लाख रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. धर्मांतर करण्यात आलेली पीडित व्यक्ती जर महिला, अल्पवयीन मूल किंवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील असेल, तर दोषीला ७ ते १० वर्षांपर्यंतच्या अत्यंत कठोर कारावासाची शिक्षा आणि ५ लाख रुपयांपर्यंतचा आर्थिक दंड ठोठावला जाऊ शकतो. एकाच वेळी दोन किंवा अधिक व्यक्तींचे एकत्रित बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणल्यास आयोजकांना १० वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि ५ लाख रुपयांचा सामूहिक दंड होऊ शकतो.

**संस्थांवर कायमची बंदी आणि अनुदान रद्द: (कलम १४)**

जर एखादी संस्था, ट्रस्ट किंवा संघटना सामूहिक किंवा छुप्या पद्धतीने बेकायदेशीर धर्मांतराचे जाळे चालवत असल्याचे तपासात उघड झाले, तर सरकार त्या संस्थेची नोंदणी कायमची रद्द (रद्दबातल) करेल.

अशा संस्थांना मिळणारा सर्व शासकीय निधी, सवलती किंवा परकीय अनुदान त्वरित थांबवून त्यांच्या व्यवस्थापकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.



**पुराव्याची जबाबदारी आरोपीवर:**

या कायद्यातील सर्वात कडक कायदेशीर पळवाट बंद करणारी तरतूद म्हणजे पुराव्याची जबाबदारी होय. सामान्य फौजदारी कायद्यांप्रमाणे यात पोलिसांना किंवा पीडितेला गुन्हा सिद्ध करावा लागणार नाही, तर "हे धर्मांतर कोणत्याही दबावाशिवाय किंवा प्रलोभनाशिवाय पूर्णपणे स्वेच्छेने झाले आहे", हे न्यायालयात सिद्ध करण्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी आरोपीवर (धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीवर/धर्मगुरूवर) असेल.

**स्वेच्छेने धर्मांतर करण्यासाठी ६० दिवस आधी अर्ज अनिवार्य**

जर एखाद्या प्रौढ व्यक्तीला कोणत्याही दबावाशिवाय, स्वतःच्या इच्छेने धर्म बदलायचा असेल, तर त्याला एक पारदर्शक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला आणि धर्मांतर करून घेणाऱ्या धर्मगुरूला ६० दिवस (२ महिने) आधी जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज सादर करावा लागेल. या ६० दिवसांच्या कालावधीत स्थानिक प्रशासकीय समिती आणि पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करतील. हे धर्मांतर पैशाच्या, नोकरीच्या किंवा कोणत्याही छुप्या आमिषाने होत नसल्याची खात्री केली जाईल. प्राधिकरणाकडून कायदेशीर मंजुरी मिळाल्यानंतरच संबंधित व्यक्तीला अधिकृतपणे धर्मांतर करता येईल आणि अशा कायदेशीर प्रक्रियेतून गेलेल्यांवर कोणतीही कारवाई होणार नाही.

धर्मांतराच्या वेळी आमिष जे दिले जातात त्यांमध्ये रोख रक्कम, मौल्यवान भेटवस्तू, नोकरीचे आश्वासन, नामांकित शाळा/महाविद्यालयात मोफत शिक्षण किंवा जीवनशैली सुधारण्याचे खोटे प्रलोभन देणे,बळजबरी शारीरिक किंवा मानसिक दबाव आणणे, जीवित वा मालमत्तेला हानी पोहोचवण्याची धमकी देणे, सामाजिक बहिष्काराची भीती घालणे किंवा 'दैवी कोप/शाप' होईल अशी धार्मिक भीती दाखवणे.

**तक्रार कोण करू शकते?**

भीतीपोटी पीडित व्यक्ती स्वतः पोलीस ठाण्यात जाऊ शकली नाही, तर पीडितेच्या वतीने तिचे माता-पिता, भाऊ-बहीण, पती-पत्नी किंवा रक्ताचे, विवाहाचे अथवा कायदेशीररित्या दत्तक घेतलेले नातेवाईक अधिकृत एफआयआर दाखल करू शकतात. या गुन्ह्यांचा तपास पोलीस उपअधीक्षक किंवा त्याहून वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फतच केला जाईल, जेणेकरून कायद्याचा गैरवापर होणार नाही.

**सरकारची भूमिका काय?**

या कायद्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात स्पष्ट केले होते की, "हा कायदा कोणत्याही विशिष्ट धर्माच्या बाजूने किंवा विरोधात नाही, तर तो सर्व धर्मांना समानतेने लागू आहे. भारतीय संविधानाने प्रत्येकाला आपल्या पसंतीच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे, मात्र फसवणूक करून किंवा सक्तीने कोणाचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरूनच हा कायदा करण्यात आला आहे."

या कायद्याच्या अधिकृत अंमलबजावणीमुळे आता महाराष्ट्र हे देशातील उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात आणि उत्तराखंड या राज्यांच्या रांगेत कडक धर्मांतर विरोधी कायदेशीर चौकट असणारे राज्य बनले आहे.

महाराष्ट्रात लागू झालेला हा कायदा सक्तीच्या, प्रलोभनात्मक आणि फसवणुकीच्या धर्मांतराला आळा घालून नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. विशेषतः आंतरधर्मीय विवाहातील अपत्याला आईचा मूळ धर्म मानण्याचा अधिकार देणे आणि मुलांचे मालमत्तेवरील हक्क सुरक्षित करणे, या तरतुदी मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने पुरोगामी व स्वागतार्ह आहेत. कोणत्याही सुजाण समाजात बळजबरीच्या आणि फसवणुकीच्या मार्गांचा निषेध व्हायलाच हवा, मात्र त्याच वेळी या कडक कायद्याच्या अंमलबजावणीत संपूर्ण पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे. '६० दिवस आधी परवानगी' किंवा 'पुराव्याची जबाबदारी आरोपीवर असणे' यांसारख्या तरतुदींमुळे प्रशासकीय यंत्रणेला मिळालेल्या व्यापक अधिकारांचा कोणताही गैरवापर होणार नाही आणि संविधानाने दिलेल्या प्रौढांच्या स्वेच्छेच्या स्वातंत्र्याला बाधा पोहोचणार नाही, याची काळजी गृह विभागाने घेतली पाहिजे. हा कायदा सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी उपयुक्त ठरत असतानाच, त्याची यशस्विता ही प्रशासनाच्या निष्पक्ष आणि संवेदनशील भूमिकेवरच अवलंबून असेल.

**अंमलबजावणीतील प्रमुख आव्हाने:** 'प्रलोभन' किंवा 'सक्ती' या शब्दांची निश्चित व सर्वसमावेशक व्याख्या करणे कठीण असल्याने अधिकाऱ्यांकडून मनमानी अर्थ काढला जाऊ शकतो. या कायद्यांचा वापर करून आंतरधर्मीय विवाह किंवा वैयक्तिक वादांमधून निरपराध व्यक्तींवर खोटे गुन्हे दाखल होण्याचा धोका असतो.यंत्रणेवरील राजकीय व सामाजिक संघटनांचा प्रभाव निष्पक्ष तपासात अडथळा ठरू शकतो. स्वेच्छेने केलेले आणि दबावाखाली केलेले धर्मांतर यातील रेषा अतिशय पुसट असते, ज्यामुळे सत्य शोधणे पोलिसांना कठीण जाते.

- ९५६१५९४३०६

# शाकिब अल हसनच्या घरावर पुन्हा हल्ला: महान अष्टपैलू खेळाडू ते वादाच्या भोवऱ्यातील राजकीय नेता

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

बांगलादेश क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि आवामी लीगचा माजी खासदार शाकिब अल हसन याच्या मागुरा शहरातील वडिलोपार्जित घरावर पुन्हा एकदा समाजकंटकांनी हल्ला केला आहे. माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी आयोजित केलेल्या व्हर्च्युअल पत्रकार परिषदेत शाकिब सहभागी झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच ही घटना घडली. ऑगस्ट २०२४ मधील राजकीय उलथापालथीनंतर दुसऱ्यांदा शाकिबचे घर हिंसाचाराचे लक्ष्य ठरले आहे.

**क्रिकेटचा 'किंग': बांगलादेश क्रिकेटचा सुवर्णकाळ आणि विक्रमांचा मेरुमणी**

राजकीय वादाच्या भोवऱ्यात सापडलेला शाकिब अल हसन हा जगातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंपैकी एक मानला जातो. बांगलादेशला जागतिक क्रिकेटच्या नकाशावर मानाचे स्थान मिळवून देण्यात त्याचा मोलाचा वाटा राहिला आहे.

**आयसीसी रँकिंगवर प्रदीर्घ वर्चस्व:** - कसोटी, वनडे आणि टी-२० या तिन्ही प्रकारांत एकाच वेळी जगातील प्रथम क्रमांकाचा अष्टपैलू खेळाडू बनण्याचा दुर्मिळ पराक्रम शाकिबने केला आहे. अनेक वर्षे तो आयसीसीच्या वनडे ऑलराउंडर रँकिंगमध्ये अव्वल स्थानी राहिला.

**२०१९ च्या विश्वचषकातील ऐतिहासिक कामगिरी:** इंग्लंडमध्ये झालेल्या २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकात शाकिबने फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये अद्वितीय खेळ केला. एकाच विश्वचषक स्पर्धेत ६०० पेक्षा जास्त धावा (६०६ धावा) आणि ११ बळी घेणारा तो विश्वातील पहिला आणि एकमेव खेळाडू ठरला.

**आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील सुवर्ण आकडेवारी:**

वनडे क्रिकेट: -२४७ सामन्यांत ७,५७० पेक्षा जास्त धावा आणि ३१७ बळी. वनडेमध्ये ७००० धावा आणि ३०० बळींचा टप्पा ओलांडणारा तो जगातील अवघ्या तीन खेळाडूंपैकी एक आहे.

कसोटी क्रिकेट: -७१ सामन्यांत ४,६०९ धावा आणि २४६ बळी. कसोटीत बांगलादेशकडून सर्वाधिक बळी घेण्याचा विक्रम त्याच्याच नावावर आहे.

टी-२० आंतरराष्ट्रीय: -१२९ सामन्यांत २,५५१ धावा आणि १४९ बळी. टी-२० क्रिकेटमधील तो जगातील सर्वोत्तम ऑलराउंडर मानला जातो.

आयपीएल व जागतिक लीग्जमधील ठसा: - कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) कडून खेळताना शाकिबने २०१२ आणि २०१४ च्या आयपीएल विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली. याशिवाय सीपीएल, बीपीएल, पीएसएल यांसारख्या जगभरातील टी-२० लीग्जमध्ये त्याने स्वतःचा वेगळा ठसा उमटवला.



पेट्रोल बॉम्बने घर पेटवण्याचा प्रयत्न: क्रिकेटच्या मैदानातील हाच नायक जेव्हा राजकीय मैदानात उतरला, तेव्हा मागुरा येथील त्याच्या सहापारा परिसरातील घराला हिंसक घटनेचा सामना करावा लागला. रात्री ८:४५ ते ९:०० च्या दरम्यान समाजकंटकांनी त्याच्या घरावर दगडफेक करून खिडक्यांच्या काचा फोडल्या.

आगीच्या खुणा: -हल्लेखोरांनी कोल्ड्रिंकच्या बाटल्यांमध्ये पेट्रोल व ज्वलनशील रसायन भरून आणून घर पेटवण्याचा प्रयत्न केला. घराच्या लोखंडी जाळीच्या गेटवर आगीच्या खुणा स्पष्टपणे दिसत आहेत.

घटनास्थळी पोलीस: - घटनेची माहिती मिळताच मागुरा सदर पोलीस ठाण्याचे पथक रात्री ९:१५ वाजता घटनास्थळी पोहोचले. घराबाहेर पोलिसांना पेट्रोल भरलेली एक बाटली सापडली आहे.

सुदैवाने जीवितहानी टळली: - हल्ल्याच्या वेळी घर पूर्णपणे रिकामे होते आणि शाकिब स्वतः सध्या श्रीलंकेत असल्याने मोठा अनर्थ टळला. सध्या या परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

**विवादास्पद व्हर्च्युअल बैठक ठरली निमित्त?**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी दोन वर्षांनंतर बुधवारी २५ मिनिटांचे व्हर्च्युअल संबोधन केले. कॅमेरा बंद ठेवून केलेल्या या संबोधनात शाकिब अल हसन, हसीना यांचे पुत्र साजीब वाजेद जॉय आणि माजी शिक्षण मंत्री मोहिबुल हसन चौधरी उपस्थित होते. या बैठकीत शाकिबची झालेली उपस्थिती राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरली, अन् त्यातूनच या हल्ल्याची ठिणगी पडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

**मैदानातील '' ते राजकारणातील 'खलनायक'?**

शाकिब अल हसनची ही शोकांतिका एका मोठ्या राजकीय संघषार्चे आणि महान खेळाडूच्या पतनाचे प्रतीक मानली जात आहे:

आंदोलन काळातील शांतता आणि रोष: - ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाविरोधात झालेल्या हिंसक विद्यार्थी आंदोलनादरम्यान आवामी लीगचा खासदार असलेला शाकिब मौन बाळगून होता. ज्या मैदानावर लाखो चाहत्यांनी त्याला डोक्यावर घेतले, त्याच देशातील पेटत्या परिस्थितीवर त्याने मौन बाळगल्याने जनमानसात तीव्र असंतोष पसरला.

गुन्हे आणि पळ काढण्याची नामुष्की: - हसीना सरकार कोसळल्यानंतर ऑगस्ट २०२४ मध्येच समाजकंटकांनी शाकिबच्या मागुरा येथील घरावर पहिल्यांदा हल्ला केला होता. त्यानंतर लष्करी उठावाच्या काळात शाकिबने बांगलादेशातून काढता पाय घेतला. विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या एका व्यक्तीच्या मृत्यू प्रकरणात त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

क्रीडा आणि राजकारणाची सरमिसळ: -खासदार झाल्यानंतरही आंतरराष्ट्रीय क्रिकेट व जगभरातील टी-२० लीग्ज खेळणे सुरू ठेवणाऱ्या शाकिबवर नेहमीच 'खासदारकी' आणि 'खेळ' यापैकी कशाला प्राधान्य द्यावे, यावरून टीका होत राहिली.

ऑगस्ट २०२४ च्या हिंसाचारानंतर बांगलादेशात आवामी लीगच्या नेत्यांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे. शाकिब अल हसनच्या घरावर झालेला हा ताजा हल्ला दर्शवतो की, क्रिकेटच्या मैदानातील १४,००० हून अधिक धावा आणि ७०० हून अधिक बळींचा महान विक्रमही, राजकीय वादांच्या आणि जनतेच्या रोषाच्या तीव्रतेपुढे निष्प्रभ ठरला आहे. एकंदर बघता शाकिबची कारकिर्द एक खेळाडू म्हणून यशस्वी राहिली असली तरी कर्णधार म्हणून वादग्रस्त निर्णय, पंचाशी हुज्जती, सहकाऱ्यांचा अनादर करणे, विरोधी खेळाडूंना नियमांच्या आधारे नको तेव्हा कचाट्यात घेरणे यामुळे तो त्याची लोकप्रियता गमावून बसला आहे.

सध्या त्याच्यावर बांगलादेशात खटला चालविला शकतो. त्यात दोषी आढळला तर त्याला फाशीची शिक्षाही होऊ शकते. असं जर झालं तर फाशीची शिक्षा होणारा तो दुसरा क्रिकेटपटू ठरेल. यापूर्वी वेस्ट इंडिजच्या लेस्ली हिल्टन या खेळाडूला फाशीची शिक्षा झाली आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ठेवीदारांचा संयम संपला! जलालखेड्यातील निर्मल उज्वल पतसंस्थेत तब्बल १८ कोटींच्या ठेवी अडकल्याचा आरोप

## दोन हजार ठेवीदार आर्थिक संकटात, परतफेड रखडल्याने संताप, चौकशीसह दोषींवर कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील निर्मल उज्वल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये गुंतवणूक केलेल्या सुमारे दोन हजार ठेवीदारांच्या तब्बल १८ कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या असल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. मुदतपूर्ती होऊनही ठेवींची परतफेड होत नसल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. आयुष्यभराची पुंजी परत मिळत नसल्याने शिक्षण, वैद्यकीय उपचार, विवाह, शेती आणि लघुउद्योगाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामे रखडली आहेत.



हक्काचे पैसे परत मिळावेत या मागणीसाठी जलालखेडा येथील निर्मल उज्वल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या शाखेत जमलेले ठेवीदार.

जलालखेडा व परिसरातील नागरिकांनी विश्वासाने या पतसंस्थेत मोठ्या प्रमाणावर मुदत ठेवी गुंतवल्या होत्या. मात्र मुदत संपून अनेक महिने उलटूनही ठेवी परत मिळत नसल्याने ठेवीदारांना शाखेच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. प्रत्येक वेळी "वरिष्ठ कार्यालयाकडून सूचना येतील", "थोडी प्रतीक्षा करा" अशी उत्तरे दिली जात असल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे. त्यामुळे शाखेसमोर दररोज ठेवीदारांची गर्दी वाढत असून असंतोष तीव्र होत आहे.

ठेवीदारांच्या माहितीनुसार, संस्थेत सुमारे १८ कोटी रुपयांच्या ठेवी जमा असून कर्जवाटप केवळ १ कोटी ७५ लाख रुपयांचे करण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित निधीचा वापर नेमका कुठे झाला, याबाबत संशय व्यक्त केला जात असून संपूर्ण आर्थिक व्यवहाराची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे.

ठेवी अडकल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन प्रवेश व शुल्क भरणे रखडले आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी बियाणे, खते व कीडनाशके खरेदी करण्यात अडचणी येत आहेत. काही कुटुंबांचे विवाह पुढे ढकलण्याची वेळ आली असून आजारी रुग्णांच्या उपचारांसाठीही पैशांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, अनेक ज्येष्ठ नागरिकांनी निवृत्तीनंतरची संपूर्ण बचत या संस्थेत ठेवली असून आता तेही चिंतेत आहेत.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सहकार विभाग, जिल्हा प्रशासन आणि राज्य शासनाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून ठेवीदारांचे पैसे सुरक्षित परत मिळवून द्यावेत, संबंधित जबाबदारांवर कठोर कारवाई करावी आणि संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण करावे, अशी मागणी ठेवीदारांनी केली आहे.

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप केला नाही, तर सर्व ठेवीदारांना एकत्र करून मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे जलालखेड्यासह संपूर्ण नरखेड तालुक्यात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पत्रकारांसाठी दोनदिवसीय एसआयआर नोंदणी शिबिरास प्रारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना एसआयआर नोंदणी प्रक्रिया सुलभ व्हावी. या उद्देशाने प्रेस क्लबमध्ये आयोजित दोनदिवसीय एसआयआर नोंदणी शिबिराचा आज उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. या उपक्रमामुळे पत्रकारांना आवश्यक शासकीय सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली.

शिबिराच्या उदघाटनप्रसंगी महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीपकुमार मैत्र, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका धनश्री देशपांडे, पूजा पाठक तसेच प्रभागातील बीएलओ उपस्थित होते.

यावेळी शुभेच्छा व्यक्त करताना डॉ. इटनकर आणि प्रदीपकुमार मैत्र यांनी सांगितले की, एसआयआर हा राष्ट्रीय महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून नागपूर शहरातील एसआयआर नोंदणीची उद्दिष्टे निश्चितपणे पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

हे नोंदणी शिबिर ६ व ७ ऑगस्ट रोजी दररोज दुपारी २ ते ४ या वेळेत प्रेस क्लब येथे सुरू राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. नगरसेवक सुनील हिरणवार आणि नगरसेविका धनश्री देशपांडे यांनी एसआयआर नोंदणी दरम्यान कोणालाही अडचण आल्यास तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले. तसेच त्या अडचणी त्वरित दूर करण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्येष्ठ पत्रकार भूपेंद्र गणवीर यांनी केले. यावेळी नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे सरचिटणीस अनुपम सोनी,पारितोष प्रामाणिक, सनी शेंडे, रणजित देशमुख, महेश उपदेव, सुनील मित्रा,अरूण आसटकर आदी हजर होते.

## भाग्यश्री दिनेश पारधी यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** सीताबर्डी येथील पारधी वाडा निवासी भाग्यश्री दिनेश पारधी (वय ७५) यांचे गुरुवारीच सकाळी ६ वाजता. हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पार्थिवावर मोक्षधाम येथे अंतिम संस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात मोठा परिवार आहे.

## थुटानबोरीत ३०० वृक्षांचे रोपण; उमरेड मतदारसंघात १० हजार वृक्षलागवडीचा संकल्प

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर :-** पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने माजी आमदार सुधीर पारवे यांनी उमरेड विधानसभा मतदारसंघात १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प केला आहे. या अभियानाचा प्रारंभ थुटानबोरी (पुनर्वसन) येथे ३०० वृक्षांच्या लागवडीने करण्यात आला. सुधीर पारवे फाउंडेशन आणि लक्ष्मणा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यापूर्वी गावातील प्रमुख मार्गावर वृक्षदिंडी काढून पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. "एक पेड, माँ के नाम" या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाला सामाजिक वनीकरण विभागाच्या वनरक्षक सुनिता राठोड, सरपंच सुनील लेकुरवाळे, ठाणेदार रवींद्र मस्कर, माजी उपसभापती नत्थू गुरपुडे, माजी सभापती कृष्णाजी घोडेस्वार, माजी उपसभापती सुधाकर बोरकुटे, सुधाकर पडोळे, आनंदराव डडमल, बालू खांबाळकर, वनरक्षक श्री. वनवे व श्री. चावट, आशा कार्यकर्त्या रंजना लेकुरवाळे, अंगणवाडी सेविका पोहेकर, प्रतिभा पाटील, सोनाताई गुरपुडे, ग्रामपंचायत सचिव सीमा मंडपे, तलाठी सौ. झाम्पलवार तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमरेड विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये टप्प्याटप्प्याने १० हजार वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्यावरही भर दिला जाणार असल्याचे यावेळी आयोजकांनी सांगितले.

# कोळसा व राखळ वाहतुकीमुळे नागरीक त्रस्त, धुळीच्या त्रासाने नागरिक वैतागले

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

आमडी फाटा ते पारशिवनी, सिगोरी ते पारशिवनी ते आमडी फाटा मार्गावर दरोरोज शेकडो ट्रक उघड्यावर कोळसा व राखळ ट्रक मधुन पारशिवनी शहर तसेच परिसरातील मार्गावरून सतत या ट्रकची वाहतूक सुरु असते. अवजड ट्रकची सतत ये-जा सुरू असते. मात्र अनेक ट्रक चालक व मालक ताडपत्री न बांधताच वाहतूक करत असल्याने कोळसा व राखेचे कण रस्त्यावर उडून मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण निर्माण होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, दुचाकीस्वार, पादचारी तसेच व्यापारी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत असून या गंभीर बाबीची दखल घेत पारशिवनीचे पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांनी सर्व ट्रक चालक व मालकांना तातडीचे ट्रकच्या



मागील भागात तारपत्री बांधण्याचे आवाहन केले आहे.

पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांनी स्पष्ट केले की, कोळसा किंवा राख वाहून नेणाऱ्या प्रत्येक ट्रकवर ताडपत्री व्यवस्थित बांधणे बंधनकारक आहे. ताडपत्री न बांधल्यामुळे वाहतुकीदरम्यान कोळसा व राख रस्त्यावर सांडते. त्यामुळे धुळीचे प्रमाण वाढून नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याबरोबरच

वाहनचालकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होतो.

पारशिवनी शहरातील मुख्य मार्ग, बाजारपेठ तसेच औद्योगिक भागाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर दिवस-रात्र अवजड वाहनांची वर्दळ असते. या वाहनांमधून उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील दुकानदार, शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रस्त्यालगत राहणाऱ्या नागरिकांना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ तसेच प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा धुळीमुळे रस्त्यावरील दृश्यमानता कमी होत असल्याने अपघाताचा धोकाही वाढतो.

यापुढे ताडपत्री न बांधता कोळसा किंवा राख वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांनी दिला आहे. वाहतूक नियमांचे पालन करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यास तसेच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी सर्व ट्रक चालक, मालक व वाहतूकदारांना केले आहे.

दरम्यान, नागरिकांनीही अशा प्रकारची निष्काळजी वाहतूक आढळल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक हिंमत राठोड, पो.हवा. किशोर येलेकर, संदिप करनाके, आकाश झाडे, रामकृष्ण दखने, दिपक दिवटे उपस्थित होते. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे धुळीचे प्रदूषण कमी होऊन शहरातील वाहतूक अधिक सुरक्षित आणि पर्यावरणपूरक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भिवकुंड कोळसा प्रकल्पावरून संघर्ष तीव्र : नांदगावात कंपनीच्या बसेस अडवून ठिय्या आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर तालुक्यातील विसापूर-नांदगाव परिसरातील प्रस्तावित भिवकुंड कोळसा ब्लॉकविरोधातील आंदोलनाला बुधवारी नवे वळण मिळाले. स्थानिक युवकांना रोजगाराच्या चर्चेसाठी पोंभूर्णा येथे नेण्यासाठी आलेल्या कंपनीच्या बसेस ग्रामस्थांनी अडवून ठिय्या आंदोलन छेडले. रोजगाराचे आमिष दाखवून युवकांची दिशाभूल करून प्रकल्पाला पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप भिवकुंड कोळसा ब्लॉकविरोधी कृती समितीने केला.



शासनाकडून भिवकुंड कोळसा ब्लॉकला मंजुरी मिळाल्यानंतर या प्रकल्पाविरोधातील जनआंदोलन अधिक तीव्र झाले आहे. विसापूर आणि नांदगाव ग्रामसभांनी यापूर्वीच ठराव मंजूर करून प्रकल्पाला विरोध दर्शविला असतानाही कंपनीकडून पुढील प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सनफ्लॉग आयर्न अँड स्टील कंपनीने स्थानिक बेरोजगार युवकांसाठी पोंभूर्णा येथे रोजगारासंदर्भात बैठक आयोजित केली होती. या बैठकीसाठी नांदगाव येथे दोन बसेस पाठविण्यात आल्या होत्या. मात्र, या हालचालीची माहिती मिळताच कृती समितीचे पदाधिकारी व शेतकरी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बसेससमोर ठिय्या आंदोलन करून कंपनीविरोधात घोषणाबाजी केली आणि बसेस पुढे जाऊ दिल्या नाहीत.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, ग्रामसभेच्या निर्णयाचा सन्मान करून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय होत नाही, तोपर्यंत भिवकुंड कोळसा ब्लॉक परिसरात कोणतीही कामे होऊ दिली जाणार नाहीत. स्थानिकांच्या संमतीशिवाय प्रकल्प पुढे नेण्याचा कोणताही प्रयत्न हाणून पाडला जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या प्रस्तावित प्रकल्पामुळे विसापूर व नांदगाव परिसरातील सुमारे ८०२ हेक्टर शेती प्रभावित होणार असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. भूमिगत कोळसा उत्खननामुळे शेतीचे मोठे नुकसान होण्याबरोबरच भविष्यात जमीन खचण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे ग्रामस्थांनी पुन्हा एकदा एकजूट दाखवत प्रकल्पाला ठाम विरोध कायम असल्याचे स्पष्ट केले.

रोजगाराच्या अपेक्षेने युवकांची धाव कंपनीच्या बसेस आंदोलनामुळे रोखल्या गेल्यानंतरही अनेक युवक रोजगाराच्या आशेने खासगी वाहनांचा आधार घेत पोंभूर्णा येथे आयोजित बैठकीसाठी रवाना झाल्याची माहिती काही युवकांनी दिली. रोजगाराची संधी मिळेल या अपेक्षेने त्यांनी बैठकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

### थोडक्यात

## प्रादेशिक स्तरावरील भरतनाट्यम स्पर्धेत कु. आदिती पाहुरकर प्रथम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय टपाल विभागातर्फे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या प्रादेशिक स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत श्रीकृष्ण नृत्यालयची विद्यार्थिनी तथा प्रमिला उन्नीकृष्णन यांची शिष्या कु. आदिती पाहुरकर हिने कनिष्ठ (ज्युनियर) भरतनाट्यम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या उत्कृष्ट यशामुळे तिची आता पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय टपाल विभागाच्या नृत्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कु. आदिती ही केंद्रीय विद्यालयातील इयत्ता ७ वीची विद्यार्थिनी असून ती विशाल पाहुरकर व पूनम पाहुरकर यांची कन्या आहे. आपल्या या यशाचे संपूर्ण श्रेय तिने आपल्या गुरू प्रमिला उन्नीकृष्णन, शाळेतील शिक्षक-शिक्षिका तसेच आई-वडिलांना दिले आहे. कु. आदितीच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही ती उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी आकाश मडावी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जमाती (एसटी) मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी नागपूरचे युवा कार्यकर्ते आकाश मडावी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे नागपूरसह संपूर्ण विदर्भातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळख असलेले आकाश मडावी यांनी भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सातत्याने सक्रिय सहभाग नोंदवत विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सन २०२२ मध्ये राज्यसभा सदस्य मायाताई इवानाते यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या पश्चिम नागपूर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानंतर २०२३ मध्ये तत्कालीन भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली त्यांची भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच नागपूर शहर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्यावर भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या नागपूर महानगराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. ही जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे आणि यशस्वीरीत्या पार पाडली. त्यांच्या उत्कृष्ट संघटन कौशल्याची, सातत्यपूर्ण जनसंपकार्ची, पक्षनिष्ठेची आणि कार्यक्षमतेची दखल घेत भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष देवराव होळी यांनी त्यांची महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती केली.




या नियुक्तीनंतर आकाश मडावी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष देवराव होळी, राज्यसभा सदस्य मायाताई इवानाते, संघटनमंत्री उपेंद्र कोठेकर, नागपूर शहर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी, प्रभारी किशोर काळकर, तसेच पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. यापुढे भारतीय जनता पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविणे, अनुसूचित जमाती समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांना प्राधान्याने वाचा फोडणे तसेच पक्ष संघटना अधिक सक्षम, गतिमान आणि बळकट करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करणार असल्याचा विश्वास आकाश मडावी यांनी व्यक्त केला.

## कोदामेंढी येथे तहसीलदारांनी केली भात लागवडीची पाहणी व भात लावणी

### नहराला पाणी सुटल्याने मौदा तालुक्यात युद्ध स्तरावर सुरू आहे भात लावणी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

नुकतेच नहराला पाणी सुटल्याने, धानपट्टा म्हणून प्रसिद्ध असलेल्या मौदा तालुक्यात गावागावात युद्ध स्तरावर भात लावणी सुरू असून,आज गुरुवार (ता. ६ ऑगस्ट )ला कोदामेंढी येथील शेतकरी लहानू बावनकुळे यांच्या शेतात तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांनी भात लागवडीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत प्रत्यक्ष भात लावणी करून शेतीविषयक उपक्रमात सहभाग नोंदविला.

याप्रसंगी भगवान बावनकुळे मंडळ अध्यक्ष भाजपा मौदा तालुका, गोपाल गिरमेकर उपसरपंच ग्रामपंचायत कोदामेंढी, दुर्गा लांजेवार महसूल अधिकारी कोदामेंढी, गोपाल पाठे कृषी सहाय्यक अधिकारी कोदामेंढी, पंकज ठेंगणे मंडळ कृषी अधिकारी निमखेडा, निखिल बडवाईक रोजगार सेवक, देवानंद मेश्राम महसूल सेवक, दिपक हटवार,रामदास बावनकुळे, लहानू बावनकुळे शेतकरी, कोदामेंढी तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. या भेटीदरम्यान भात लागवडीच्या सद्यस्थितीची माहिती घेण्यात आली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

थोडक्यात

## महावितरणचा भोंगळ कारभार; दोन महिन्यांनंतरही कार्यवाही शून्य!

### वाडीतील नागरिक संतप्त; अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरसह धोकादायक वीज तारा हटविण्याची मागणी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, धोकादायक वीज तारा आणि अपुऱ्या विद्युत सुविधांमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. दोन महिन्यांपूर्वी निवेदन देऊनही महावितरण प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने नागरिकांचा संताप अखेर उफाळून आला आहे. गुरुवार (दि. ६ ऑगस्ट) रोजी सकाळी ११.३० वाजता प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक आनंदबाबू कदम यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महावितरण कंपनी, लाव्हा (वाडी) येथील प्रिन्सिपल टेक्निशियन योगिता बाहे यांना विविध समस्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात पावसाळ्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने परिसर अंधारात बुडत असून साप, विंचूसारख्या विषारी प्राण्यांचा धोका वाढला असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढून डेंग्यू व मलेरियासारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण झाला असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली.

प्रभागात तातडीने अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविणे, रस्त्यामधील धोकादायक वीज खांब हटविणे आणि घरांना लागून गेलेल्या वीज तारा स्थलांतरित कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. विशेष म्हणजे, २ जून २०२६ रोजी याच मागण्यांसाठी महावितरणला निवेदन देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "यापुढेही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील," असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी प्रफुल गिरी, भीमराव धाडसे, प्रकाश देशमुख, दत्ता बाबर, विजय सोनवाने, रमेश मौर्या, लाखन पारधी, राजेंद्र सूर्यवंशी, लक्ष्मण यादव, विक्की चौधरी, प्रवीण वानखेडे, हरीभाऊ सोनवाने, गणपत वसाके, दत्तात्रय लांबे, श्रीराम सावरकर, शंकर चापके यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## हिरोशिमा दिनानिमित्त अणुयुद्धाविरोधी जनजागृती कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सिंधू नवयुवक मंडळाच्या राजकुमार केवलरामानी कन्या महाविद्यालय, नागपूर येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने हिरोशिमा दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ व्याख्याते डॉ. युगल रायलू यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजशास्त्र विभागाच्या प्रा. माधवी मोहरील यांनी हिरोशिमा दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले तसेच प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. युगल रायलू यांनी सुमारे ४० मिनिटांच्या पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे हिरोशिमा व नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्याची भीषणता विद्यार्थिनींसमोर उलगडून सांगितली. पोस्टर्स व छायाचित्रांच्या माध्यमातून अण्वस्त्रांचा मानवी जीवन, पर्यावरण आणि संपूर्ण पृथ्वीवर होणारा विनाशकारी परिणाम स्पष्ट केला. तसेच अणुयुद्ध टाळून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याची आजची गरज अधोरेखित केली. संवाद सत्रात विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारले. यावेळी सर्व विद्यार्थिनींनी "आम्हाला युद्ध नको, शांतता हवी" असा एकमुखी संदेश देत जागतिक शांततेचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमांच्या सरतेशेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता चांदवाणी यांनी आपले मनोगत व्यक्त करून शांतता, मानवता आणि सहअस्तित्वाची मूल्ये जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. रजनी हरोडे यांनी मानले.

## जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा भोवरी येथे भरली छत्री पेंटिंगची कार्यशाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

नेहमीच काळ्या रंगातली किंवा दुकानात मिळणारी डिझाइन्सची छत्री प्रत्येकाकडेच असते. पण आपल्याला आवडतील ते रंग, थीम, डिझाईन हे सगळं तुमच्या छत्रीवर उतरवण्याची संधी देण्यासाठी 'जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा भोवरी 'मध्ये छत्री रंगवण्याची कार्यशाळा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. सुरुवातीला पांढऱ्याशुभ्र छत्र्यांना पाण्यानं स्वच्छ धुवून त्यावर कोटिंग करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आलं. त्यानंतर अक्रॅलिक रंगांच्या सहाय्याने छत्र्यांना रंगीबेरंगी टच देण्यात आला. यामध्ये, कोणत्या रंगाची निवड करावी, रंगांचा वापर कशा पद्धतीनं होणं आवश्यक आहे, छत्रीचा एखादा भाग मोकळा ठेवून त्याठिकाणी कोणती संकल्पना मांडता येऊ शकते, वयोगटाप्रमाणे छत्रीची थीम कशी बदलते आदी विविध मुद्द्यांबाबत कार्यशाळेला उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका पठाण तब्बसूम यांनी मार्गदर्शन केलं. छत्री रंगवताना थीम कशी निवडावी हेही त्यांनी समजावून सांगितलं.



यावेळी स्वतःच्या आवडत्या रंगांमधून योग्य ती रंगसंगती साधत, हटके थीम्सचा वापर करत आपली छत्री आकर्षक करण्याची ही कल्पना विद्यार्थ्यांना खूप आवडली.सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा आनंद लुटला.

# 'Gen Z'ने केला तुकडोजी महाराजांच्या भक्ती-विचारांचा जागर

## २४ युवा भजन मंडळांनी नोंदवला सहभाग, विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेला दुसऱ्या दिवशीही

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पारंपरिक भजन ही केवळ जुन्या पिढीची साधना नसून नव्या पिढीलाही राष्ट्रसंतांचे विचार तितकेच प्रेरित करत असल्याची प्रचिती विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेच्या निमित्ताने आली. या स्पर्धेत विदर्भातील तब्बल २४ युवा भजन मंडळांनी खंजरी हाती घेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भक्ती, राष्ट्रप्रेम आणि समाजप्रबोधनपर विचारांचा जागर केला.



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित या स्पर्धेला बुधवारी प्रारंभ झाला. विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून महिला, पुरुष आणि युवकांची भजनी मंडळे पारंपरिक वेशभूषेत तबला, पेटी, हार्मोनियम, टाळ आणि खंजरीसह मोठ्या उत्साहाने नागपुरात दाखल झाली आहेत. सक्करदऱ्यातील श्री संताजी सभागृह परिसरात सुरू असलेल्या या स्पर्धेत अमरावती, अकोला, भंडारा यांसह विदभार्तील ग्रामीण आणि दुर्गम भागांतूनही भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले यांनी गुरूवारी स्पर्धकांना प्रमाणपत्राचे वितरण केले.

यावेळी त्यांनी स्पर्धेतील युवा मंडळांच्या सहभागाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, राष्ट्रसंतांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचत असून तरुणाई खंजरी आणि भजनाच्या परंपरेशी जोडली जात आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

नागपूर शहरातून १८२, नागपूर जिल्ह्यातून ९० आणि विदर्भातील अन्य जिल्ह्यांतून १५५ अशा एकूण ४२७ भजनी मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. प्राथमिक फेरीचा शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी समारोप नागपूर शहर व नागपूर जिल्ह्यातील स्पर्धकांच्या फेरीने होणार असून आमदार मोहन मते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या फेरीला प्रारंभ होईल.

प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या उत्कृष्ट भजनी मंडळांची अंतिम फेरी रविवार, ९ ऑगस्ट रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रंगणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्या मंडळांना पारितोषिके प्रदान करण्यात येतील.

अंतिम फेरी व पारितोषिक वितरण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, जयप्रकाश गुप्ता, अविनाश घुशे, प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, डॉ. गौरीशंकर पाराशर, देवेंद्र यादव, शशांक खेकरे, डॉ. दीपक खिरवडकर, बाळासाहेब कुळकर्णी, चेतन कायरकर, दिलीप जाधव, संदीप गवई, रेणुका देशकर, भोलानाथ सहारे, विलास त्रिवेदी, नितीन तेलगोटे, किशोर पाटील, मनीषा काशिकर, राजू कनाटे, योगेश बन, डॉ. श्रीरंग वराडपांडे, श्रद्धा पाठक, अभिजित कथले, सुजाता कठवते, दर्शना नखते, सुजाता खांबाता, प्रशांत दिवाणजी, धनश्री भोरकर, कविता इंगळे, कल्पना मनापुरे आणि समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## कवी ग्रेस यांच्या साहित्यनिर्मितीवर आधारित 'साजणवेळा' ९ ऑगस्टला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर आणि सप्तक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिभावंत कवी ग्रेस यांच्या साहित्यनिर्मितीवर आधारित 'साजणवेळा' हा विशेष संगीत-काव्याचा कार्यक्रम रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता गायत्रीनगर येथील कविकुलगुरू कालिदास सभागृह, पर्सिस्टंट सिस्टिम्स, गायत्री नगर येथे आयोजित करण्यात आला आहे. मराठी साहित्यातील अत्यंत संवेदनशील, गूढ आणि वैशिष्ट्यपूर्ण काव्यशैलीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवी ग्रेस यांच्या निवडक साहित्याला संगीताची साथ लाभलेल्या या कार्यक्रमातून एक वेगळा कलानुभव रसिकांना मिळणार आहे. ग्रेस यांच्या कवितांमधील भावविश्व, शब्दसौंदर्य आणि जीवनदृष्टी संगीताच्या माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाचे निवेदक विवेक अलोणी असून, सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध जोशी आणि डॉ. मंजिरी वैद्य-अय्यर हे सादरीकरण करणार आहेत. त्यांना श्रीकांत पिसे, मोरेश्वर दहासहस्त्र, आणि ऋग्वेद पांडे हे साथसंगत करतील. या कार्यक्रमाची संहिता आणि संकलन प्रसिद्ध अभिनेते चंद्रकांत काळे यांचे असून संगीत आनंद मोडक यांचे आहे. प्रवेश विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमाचा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने कमलेश बिसेन सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत सन २०२४-२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी ग्रामपंचायत रायपूर, पंचायत समिती गोंदिया येथे कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी कमलेश वजीर बिसेन यांची निवड झाली आहे. त्यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेबरोबरच सामाजिक बांधिलकी, कर्मचारी चळवळीतील योगदान, सहकार क्षेत्रातील नेतृत्व आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची ही राज्यस्तरीय पावती मानली जात आहे. कमलेश बिसेन हे गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचारी चळवळीतील सक्रिय नेतृत्व म्हणून ओळखले जातात. कर्मचारी हिताच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष करत सिंहाचा वाटा उचलला आहे. ते ग्रामपंचायत अधिकारी संवगार्चे गोंदिया जिल्हाध्यक्ष असून जिल्हा परिषद व मध्यवर्ती सरकारी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. कर्मचारी, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधून प्रश्न मार्गी लावण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय मानले जाते. याशिवाय ते जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत असून त्यांच्या कार्यकाळात सभासदांच्या हितासाठी अनेक कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत.



पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदाभिमुख निर्णयांमुळे संस्थेवर सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. श्री. बिसेन हे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांच्या पुढाकारातून या पतसंस्थेची स्थापना झाली. संस्थेच्या माध्यमातून ग्रामपंचायत अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले. आरोग्य संजीवनी योजना, कुटुंब कल्याण निधी योजना तसेच इतर विविध सभासद कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून शेकडो सभासदांना आर्थिक आधार, सामाजिक सुरक्षा आणि संकटाच्या काळात मदतीचा हात देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. ग्रामीण विकास हा केवळ शासकीय जबाबदारी न मानता लोकसहभागातून विकास घडवून आणण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. जिल्हा परिषदेमधील पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात समन्वयाचे दुवा म्हणून ते सातत्याने कार्यरत असून शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, गावांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी त्यांनी अनेक सकारात्मक उपक्रम राबविले आहेत. सामाजिक कार्य, सहकार क्षेत्रातील नेतृत्व, कर्मचारी चळवळीतील योगदान आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी निवड केली आहे.

## महामार्गावरील इलेक्ट्रिकल-रिवायडींगचे दुकान फोडले, व्यापाऱ्यात भीतीचे वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

महामार्गालगत आणि पोलीस ठाण्यापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या इलेक्ट्रिकल दुकानाचे शटर लोखंडी रॉडने वाकवून अज्ञात चोरट्यांनी तब्बल ७० हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या तारेवर हात साफ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. भरवस्तीत आणि पोलिस ठाण्यापासून थोड्याच अंतरावर घडलेल्या या धाडसी चोरीने शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

उदासीन मठाच्या चाळीत महामार्गालगत किशोर सोनकुसरे यांचे रोहित इलेक्ट्रिक अँड मोटार रिवाइंडिंग हे दुकान आहे.



गुरुवारी सकाळी शेजारील दुकानदारांना दुकानाचे शटर वाकलेले दिसताच त्यांनी सोनकुसरे यांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. चोरट्यांनी शटर उचकटून दुकानात प्रवेश करत तांब्याच्या तारेची बंडले लंपास केली. चोरीस गेलेल्या मालाची किंमत सुमारे ७० हजार रुपये असल्याचे सोनकुसरे यांनी सांगितले.

पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले; मात्र त्यातून ठोस धागेदोरे मिळाल्याचे समोर आलेले नाही. सोनकुसरे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी येथील सुसुंद्री परिसरातील योगेश निमोडिया यांच्या घरफोडीचा तपास अद्यापही अधांतरीच आहे. त्या वेळी चोरट्यांनी पाच ते सहा घरांवर डल्ला मारण्याचाही प्रयत्न केल्याची माहिती समोर आली होती. तरीही त्या टोळीचा माग काढण्यात पोलिसांना यश आलेले नाही.

जुगार अड्ड्यांवर धाडी, दुचाकी चालकांवरील कारवाया आणि दंडवसुलीत पोलिसांची तत्परता दिसून येते; मात्र घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपी मोकाटच फिरत असल्याची भावना नागरिकांमध्ये बळावत आहे. पोलीस ठाण्याच्या इतक्या जवळ घडलेल्या या धाडसी चोरीनंतर व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, "चोर पकडणार कधी?" असा सवाल व्यापारी आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## नरखेड तालुक्यात बोगस डॉक्टरांचे जाळे, थातूरमातूर शस्त्रक्रियांचेही धक्कादायक प्रकार? प्रशासन कारवाई कधी करणार?

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात बोगस डॉक्टरांचे जाळे दिवसेंदिवस वाढत असल्याची गंभीर चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. अनेक गावांमध्ये कोणतीही अधिकृत वैद्यकीय पदवी अथवा शासनमान्य नोंदणी नसलेली व्यक्ती सर्रास उपचार करत असल्याचा आरोप होत आहे. काही ठिकाणी किरकोळ शस्त्रक्रिया व टाके घालण्यासारखे प्रकारही घरी अथवा अपुऱ्या सुविधांमध्ये केले जात असल्याची माहिती समोर येत असून, यामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये बोगस डॉक्टरांनी ठाण मांडले असून ताप, सर्दी, खोकला यांसारख्या आजारांपासून गंभीर रुग्णांवरही उपचार केले जात असल्याचे सांगितले जाते. अनेक ठिकाणी इंजेक्शन, सलाईन, औषधोपचार तसेच लहान-मोठ्या शस्त्रक्रिया केल्या जात असल्याची चर्चा असून, यामध्ये कोणत्याही वैद्यकीय नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




ग्रामीण भागात तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता, तातडीची आरोग्य सेवा उपलब्ध नसणे आणि जनजागृतीचा अभाव यामुळे अनेक रुग्ण अशा बोगस डॉक्टरांच्या जाळ्यात अडकत असल्याचे चित्र आहे. आर्थिक फायद्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये बोगस डॉक्टरांविरोधात कारवाया झाल्या असताना नरखेड तालुक्यात मात्र अशा प्रकारांवर ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नाही, अशी नागरिकांची भावना आहे. त्यामुळे संबंधित आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग यांनी संयुक्त तपास मोहीम राबवून बोगस डॉक्टरांचा शोध घ्यावा, त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित करावे, अशी मागणी होत आहे.

"एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. आरोग्य विभागाने तालुक्यातील खासगी दवाखान्यांची तपासणी करून परवाना, नोंदणी, पात्रता आणि उपचार पद्धतीची पडताळणी करावी, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## सर्व मतदारांनी १७ ऑगस्टपूर्वी गणना अर्ज जमा करावेत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ५४-नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी १७ ऑगस्ट २०२६ पूर्वी गणना अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बूथ लेव्हल अधिकारी यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या मतदारांना अर्ज मिळाला नसेल किंवा अर्ज भरण्यात अडचण येत असेल त्यांनी संबंधित बीएलओंशी संपर्क साधावा. तसेच आपल्या नावाची नोंद, पत्ता, छायाचित्र व इतर तपशीलांची खात्री करून आवश्यक ती माहिती उपलब्ध करून द्यावी. बीएलओ तसेच राजकीय पक्षाचे बूथ लेव्हल एजंट यांच्या समन्वयातून घरोघरी भेटी देऊन प्रलंबित अर्जाचे संकलन करण्यात येत आहे.

मतदारांनी आपल्या नावाची नोंद, पत्ता, छायाचित्र आणि इतर तपशील योग्य असल्याची खात्री करावी. स्थलांतरित, अनुपस्थित, मृत अथवा दुबार नोंद असलेल्या मतदारांबाबत वस्तुनिष्ठ माहिती बीएलोंना उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी शेवटच्या दिवसाची प्रतीक्षा न करता, १७ ऑगस्ट २०२६ पूर्वी गणना अर्ज जमा करून या राष्ट्रीय कामात प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी प्रशांती माने यांनी केले आहे.

## किडनी स्टोनवर आता चिरा नाही, वेदनाही नाही!

### लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक होल्मियम लेझर उपचार सुरू, आयुष्मान योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना मोफत सुविधा

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

किडनी स्टोनच्या त्रासाने ग्रस्त रुग्णांसाठी मोठा दिलासा देणारी सुविधा आता नागपुरात उपलब्ध झाली आहे. एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड




येथील युरोलॉजी विभागात अत्याधुनिक होल्मियमः AG लेझर तंत्रज्ञान सुरू करण्यात आले असून, या उपचारपद्धतीमुळे कोणतीही बाह्य चीर न देता किडनी व मूत्रनलिकेतील खडे प्रभावीपणे काढणे शक्य झाले आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे पारंपरिक शस्त्रक्रियेची गरज बहुतांश रुग्णांमध्ये टळत आहे. उपचारादरम्यान कमी वेदना, अत्यल्प रक्तस्त्राव, संसर्गाचा कमी धोका, रुग्णालयात कमी दिवस मुक्काम आणि जलद रिकव्हरी हे या उपचाराचे प्रमुख फायदे आहेत. विशेष म्हणजे आयुष्मान भारतझ्रप्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ही सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

युरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. स्वानंद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली विभागाने अनेक गुंतागुंतीच्या मूत्ररोगांवर यशस्वी उपचार करून विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. अत्याधुनिक एंडोयुरोलॉजी सुविधांनी सुसज्ज असलेल्या या विभागात मोठे किडनी स्टोन, मूत्रनलिकेत अडकलेले स्टोन, वारंवार होणारे स्टोन तसेच इतर जटिल मूत्ररोगांवर प्रभावी उपचार केले जात आहेत. डॉ. स्वानंद चौधरी म्हणाले, "होल्मियम लेझर तंत्रज्ञानामुळे किडनी स्टोनच्या उपचारात आमूलाग्र बदल झाला आहे.

आता बहुतांश रुग्णांना ओपन सर्जरीची गरज भासत नाही. कमी वेदना, जलद बरे होणे आणि उत्कृष्ट परिणामांमुळे रुग्णांना सुरक्षित व दजेर्दार उपचार त्यांच्या शहरातच मिळत आहेत. किडनीचे कायमस्वरूपी नुकसान टाळण्यासाठी स्टोनचे वेळेत निदान व उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे." एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा यांनी युरोलॉजी विभागाचे अभिनंदन करत संस्थेची अत्याधुनिक, परवडणारी आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्याची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. मध्य भारतातील अत्याधुनिक होल्मियमः AG लेझर तंत्रज्ञानाचा समावेश करून लता मंगेशकर हॉस्पिटलने किडनी स्टोनवरील सुरक्षित, प्रभावी, कमी आघातकारक आणि कॅशलेस उपचारांच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, हजारो रुग्णांसाठी ही सुविधा आशेचा किरण ठरणार आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या NEP २०२० (३-२-१) अभ्यासक्रम रचनेवर एकदिवसीय कार्यशाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ पासून लागू होणाऱ्या NEP २०२० (३-२-१) पॅटर्ननुसार संरचना, योजना आणि अभ्यासक्रम या विषयावर शनिवारी ८ ऑगस्ट रोजी हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, मारिया कला व विज्ञान महाविद्यालय (देवळी, वर्धा), यशोदा कन्या कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, अशोक मोहरकर कला व वाणिज्य महाविद्यालय (अड्याळ), उम्मे सलमा कला व विज्ञान महाविद्यालय, नागपूर तसेच अंजुमन कला महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर अडबाले आणि संस्थेचे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक सत्रात डॉ. उमेश पालीगुंडवार, अधिष्ठाता (विज्ञान शाखा), डॉ. शामराव कोरेटी, अधिष्ठाता (मानवीय विद्याशाखा), डॉ. संजय कवठेकर, माजी अधिष्ठाता तसेच डॉ. तुषार चौधरी, अध्यक्ष, बोर्ड ऑफ स्टडीज (कॉमर्स), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे मार्गदर्शन करणार आहेत. समारोप सत्रात डॉ. अखिलेश पेशवे, प्र-कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

# सावजी विदर्भाची शान!

# रेस्टॉरंट्स बंद पडतील असे बोलू नका!

### महसूल मंत्री बावनकुळे यांचा अधिकाऱ्यांनी थेट इशारा, मुंढेंच्या 'सावजी मटण' विधानावर बावनकुळेंचा कडक प्रहार

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

"सावजी हा व्यवसाय विदर्भाची शान आहे. हजारो कुटुंबांचा हा रोजगाराचा आधार असून, व्यवसाय बंद पडेल किंवा या उद्योगाला बळीचा बकरा बनवले जाईल अशी कोणतीही विधाने अधिकाऱ्यांनी करू नयेत," असा सज्जड इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणाबाबत केलेल्या विधानाचा तीव्र शब्दांत समाचार घेत महसूल मंत्र्यांनी





सावजी व्यवसायाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका मांडली आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अमरावती येथील एका कार्यक्रमात "मी जर हे सावजी मटण खाल्ले, तर महिनाभर आजारी पडेन आणि हॉस्पिटलमध्ये जावे लागेल," असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या विधानामुळे सावजी रेस्टॉरंट चालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला होता. या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना महसूल मंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांच्या अशा सरसकट वक्तव्यांवर कडक आक्षेप नोंदवला.

बावनकुळे म्हणाले, विदर्भामध्ये गेली तीन-चार पिढ्यांपासून सावजी रेस्टॉरंट्स अत्यंत प्रामाणिकपणे सुरू आहेत. सावजी ही मसाला आणि अन्नपदार्थ बनवण्याची एक आगळीवेगळी आणि पारंपरिक पद्धती आहे. विदर्भात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सावजीच्या जेवणाचा आस्वाद घ्यावासा वाटतो, इतकी या अन्नाची लोकप्रियता आहे. हे खास मसाले इतर कोणीही बनवू शकत नाही. आज जगातल्या अनेक देशांमध्ये सावजीच्या पदार्थांना मोठी मागणी असताना, एका अधिकाऱ्याने संपूर्ण उद्योगावर अशी सरसकट आणि नकारात्मक टिप्पणी करणे पूर्णपणे अयोग्य आहे.

महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले की, अन्नात कुठे भेसळ किंवा आरोग्याला धोका निर्माण करणारी गोष्ट आढळल्यास त्या विशिष्ट ठिकाणी कायदेशीर कारवाई करण्यास कोणाचीही अडचण नाही. परंतु, संपूर्ण सावजी व्यवसायाला लक्ष्य करणे चुकीचे आहे. हा केवळ एक रेस्टॉरंट व्यवसाय नसून, घरातील पारंपरिक जेवण ग्राहकांपर्यंत पोहोचवणारा हा हजारो कुटुंबांचा मोठा गृहउद्योग आहे. त्यामुळे या व्यवसायाला फटका बसेल किंवा रेस्टॉरंट्स बंद पडतील, अशा स्वरूपाची वक्तव्ये अधिकाऱ्यांनी टाळावीत, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला.

## इंडियन मेडिकल असोसिएशन सावनेर शाखेचा CCMP नोंदणीविरोधात संप

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC) मध्ये CCMP (Certificate Course in Modern Pharmacology) पूर्ण केलेल्या इल्टर डॉक्टरांची नोंदणी करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र राज्याच्या हाकेला प्रतिसाद देत IMA सावनेर शाखेने अध्यक्ष डॉ. स्मिता भुडे यांच्या नेतृत्वाखाली अनिस्चतकालिन संप आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला.

या आंदोलनात सावनेरमधील आधुनिक वैद्यक पद्धतीचे डॉक्टर सहभागी झाले. OPD, नियमित वैद्यकीय सेवा, आपत्कालीन व अतिदक्षता सेवा प्रतीकात्मकरीत्या बंद ठेवून शासनाच्या निर्णयाचा निषेध



करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष डॉ. स्मिता भुडे आणि डॉ. विजय धोटे यांनी सांगितले की, "आधुनिक वैद्यकशास्त्राची गुणवत्ता, वैद्यकीय शिक्षणाची शास्त्रीय पातळी आणि रुग्णांची सुरक्षितता अबाधित राहावी, या उद्देशाने IMA राज्य शाखेच्या आंदोलनाला सावनेर शाखेने पूर्ण पाठिंबा दिला आहे. हा लढा कोणत्याही वैद्यकीय पद्धतीविरोधात नसून रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आणि आधुनिक वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाच्या संरक्षणासाठी आहे."

IMA महाराष्ट्राने शासनाकडे CCMP पात्र BHMS डॉक्टरांना MMC नोंदणी देण्याचा निर्णय पुनर्विचार करून मागे घेण्याची मागणी केली असून, याबाबत राज्यभरातील डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सावनेर शाखेच्या या आंदोलनात IMA चे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले आणि रुग्ण

### शहरातील दवाखाने कडकडीत बंद

सुरक्षा, पुराव्यावर आधारित आधुनिक वैद्यकशास्त्राचे संरक्षण तसेच वैद्यकीय व्यवसायाची गुणवत्ता कायम राखण्यासाठी आपली एकजूट दर्शविली.

यावेळी आयएमचे सचिव डॉ. प्रविण चव्हाण, कोशाद्यक्ष डॉ. विशाल महंत तसेच डॉ. अशोक घटे, डॉ. रवींद्र नाकाडे, डॉ. चंद्रकांत मानकर, डॉ. ज्योत्सना धोटे, डॉ. विनोद बोकडे, डॉ. करुणा बोकडे, डॉ. आशिष चांडक, डॉ. परेश झोपे, डॉ. अमित बाहेती, डॉ. शिवम पुनियानी, डॉ. संगीता जैन, डॉ. निलेश कुंभारे, डॉ. सोनाली कुंभारे, डॉ. हेमंत पाटील, डॉ. प्राची भगत, डॉ. विलास मानकर, डॉ. गुंजन धुंडेले, डॉ. जयंत कडसकर, डॉ. अंकिता बाहेती, डॉ. मयूर डोंगरे, डॉ. उमेश जीवतोडे, डॉ. प्राज जयस्वाल डॉ. अमरेश प्रकाशे आणि डॉ. जयंत बरेठिया उपस्थित होते.

## एकदंत लॉनविरोधात नागरिकांचा संताप

### नियमभंगाच्या चौकशीसह परवाना स्थगित करण्याची राकॉंची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर शहरातील प्रभाग क्रं १० मध्ये एकदंत लॉनमुळे परिसरातील नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत संबंधित लॉनची तात्काळ चौकशी करून आवश्यक सुविधा उपलब्ध होईपर्यंत त्याचा परवाना स्थगित करावा किंवा लॉन बंद ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस चे नगर सेविका साजिया शेख यांनी याबाबत



मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून संबंधित लॉनकडून नागरी सुविधा, स्वच्छता आणि सार्वजनिक सुव्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला आहे. निवेदनात म्हटले आहे की, एकदंत लॉनमध्ये पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्यामुळे कार्यक्रमांच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाहने सार्वजनिक रस्त्यावर उभी केली जातात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन परिसरातील नागरिकांना ये-जा करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच कार्यक्रम संपल्यानंतर उष्टे अन्न व इतर कचरा सार्वजनिक नाल्यांमध्ये टाकला जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. हा प्रकार सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणारा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय कार्यक्रमादरम्यान लॉन समोर मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जात असल्याने ध्वनीप्रदूषण वाढत असून ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण तसेच परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार सार्वजनिक शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही गंभीर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित लॉनकडून कार्यक्रमांसाठी अवाजवी व मनमानी शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारीही पुढे आल्या असून नगर परिषदेमार्फत नियमबद्ध दर निश्चित करून त्याची कठोर अंमलबजावणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. निवेदनात एकदंत लॉनची तात्काळ तपासणी करून आवश्यक अटी व नियमांचे पालन झाले आहे की नाही, याची पडताळणी करावी, त्रुटी आढळल्यास परवाना स्थगित करावा किंवा सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध होईपर्यंत लॉन बंद ठेवावे, तसेच महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेचे नियम तसेच लागू असलेल्या इतर कायदेशीर तरतुदींनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रभागातील नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि. राकेश सोमानी, नगरसेवक सुमित उर्फ गोलू डोहने, नगरसेवक प्रणित सातपुते आणि कार्यकर्ते शाहिद शेख यांनीही केली आहेत.

## शिष्यवृत्ती वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### उमरेड युथ फाऊंडेशनचा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि अटळ चिकाटी यांच्या बळावर कोणतेही यश संपादन करता येते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते नागपूर नागरिक सहकारी बँक लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक यांनी पुढे इयत्ता दहावी व बारावी चे वर्ष विद्यार्थ्यांनी स्पष्ट ध्येय निश्चित करून त्यासाठी योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, पुस्तके, शिक्षकांचे मार्गदर्शन व उपलब्ध सर्व शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करून ध्येय प्राप्त होईपर्यंत अविरत प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे. सातत्याने केलेले प्रामाणिक प्रयत्नच शेवटी यश, समाधान आणि उज्ज्वल भविष्याची हमी देतात असे या प्रसंगी मार्गदर्शन केले.

उमरेड युथ फाऊंडेशनच्या वतीने आयोजित वार्षिक शिष्यवृत्ती वितरण व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी नेहाताई भदोरिया यांनी कायार्चे कौतुक करत गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती उपक्रमाचे विशेष स्वागत केले. अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीराम मारबते, उमरेड युथ फाऊंडेशनचे संस्थापक अनिलकुमार गोविंदानी, संयोजक सचिन कुहिकर, पूर्वाध्यक्ष दीपक पटले, अध्यक्ष मनीष बालपांडे, सचिव समर भगत इतर मान्यवर उपस्थित होते.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत शहरातून प्रथम तीन क्रमांकात आलेल्या एकूण २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शहरातील सर्व माध्यमिक शाळांमधील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांपैकी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांना एकूण १४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद आणि शहरातील अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालन संजय चाचरकर व रितेश राऊत यांनी तर समर भगत यांनी आभार मानले. यावेळी विलास रायपूरकर, सौरभ भिवगडे, प्रांजल डहाके, मुकेश गौतम, आशिष वंजारी, सचिन जोधे, हितेश गडबोरीकर, विक्रांत वरघने, दिनेश ढेबुदास, आदींनी विशेष सहकार्य केले.

# दगडी चाळ टोळीसमोर हायटेक पोलीस यंत्रणा फेल...!

### ९६ तासानंतरही आरोपी मोकाट, खापरखेड्यात गॅंगवारमूळे सर्वसामान्य नागरिकांत दहशत, आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या मोका लावण्याच्या सूचना

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात वर्ग होऊन एक वर्ष पूर्ण होत असतानाच खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. २ ऑगस्ट रोजी मुख्य बाजारपेठेत घडलेल्या रक्तरंजित गॅंगवारमूळे खापरखेडा परिसरात दहशत निर्माण झाली आहे दगडी चाळ टोळी समोर पोलिसांची हायटेक यंत्रणा फेल



ठरली असून मागील ९६ तासापासून आरोपी मोकाट आहेत यासंदर्भात डॉ आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी घटनेतील सर्व आरोपीवर मोका लावण्याच्या सूचना केल्या असून आरोपीना तातडीने अटक करण्याचे आदेश शहर पोलीस आयुक्त यांना दिल्या आहेत.

तडीपार आरोपी सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके आणि दगडी चाळ टोळीने तलवार, चाकू व फावड्यांनी तीन युवकांवर प्राणघातक हल्ला केला सदर हल्ल्यात हिमांशू कडू हा युवक गंभीर जखमी झाला आहे. धक्कादायक म्हणजे सूरज कावळे व शुभम उर्फ शेरू उईके तडीपार असून सुद्धा आरोपी परिसरात मोकाट फिरत होते.

पोलिसांनी केलेल्या कॉम्बिंग ऑपरेशन दरम्यान ताब्यात घेऊन सुद्धा खापरखेडा पोलिसानी आरोपींना सूचना पत्र देऊन सोडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. खापरखेडा पोलीस ठाणे १५ ऑगस्टला शहर आयुक्तालयात समावेश करण्यात आले वर्षभरात दोन निर्घृण खून, बँक रॉबरी आणि अंमली पदार्थांची उघड तस्करी यामुळे गुन्हेगारीचा ग्राफ वाढला आहे अजूनही पिपळा डाकबंगला शिवारात झालेल्या बँक रॉबरी व गोळीबार करून लूटमार प्रकरणातील आरोपी खापरखेडा पोलिसानी गवसले नाही उलट एका खुनाचे आरोपी अजूनही मोकाट आहेत. खापरखेडा परिसरात अनेक अवैध धंदे सुरू आहेत. शिवाय तडीपार गुन्हेगार सुरज कावळे याला खापरखेडा पोलिसांनीच एमडी अमली पदार्थ विक्रीचे खैरात वाटल्याचा आरोप होतो आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी दखल घेतली असून शहर पोलीस आयुक्त यांना आवश्यक सूचना दिल्या असून खापरखेडा पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी वाढविण्याची मागणी केली आहे.

# "तुकाराम" : संघर्षातून घडलेला प्रशासक

डॉ. राजेंद्र विमल रामहरी टेकाडे

ज्येष्ठ पत्रकार शफी पठाण यांनी लिहिलेले आणि न्यू इरा पब्लिकेशन हाऊसने प्रकाशित केलेले "तुकाराम" हे पुस्तक केवळ एका सनदी अधिकाऱ्याचे चरित्र नाही, तर प्रतिकूलतेच्या गर्भातून स्वतःचे भविष्य कोरून काढणाऱ्या एका सामान्य मुलाच्या असामान्य प्रवासाचे दस्तऐवजीकरण आहे. २१६ पृष्ठांच्या या ग्रंथात लेखकाने दबंग प्रेरणादायी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जन्मापासून ते पहिल्या प्रशासकीय आदेशापर्यंतचा प्रवास अतिशय बारकाईने रेखाटला आहे. मात्र या पुस्तकाचे खरे मोल घटनांच्या तपशिलात नसून, त्या घटनांमागे दडलेल्या जीवनमूल्यांत आणि तत्त्वज्ञानात आहे, जे आजच्या स्पर्धा परीक्षार्थी तरुणाईला आणि एकूणच समाजाला दिशादर्शक ठरावे.

या पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लेखक शफी पठाण यांनी वापरलेली भाषाशैली आहे. अतिशय सोपी, साधी आणि सरळ भाषा हे या पुस्तकाचे बलस्थान आहे. कोणत्याही सर्वसामान्य वाचकाला ही भाषा सहजपणे रुचते, कुठेही क्लिष्ट शब्दांचा किंवा अवघड वाक्यरचनेचा अडथळा वाचनाच्या ओघात येत नाही. यामुळेच वाचक एकदा पुस्तक हाती घेतो की, पुढे काय घडणार याची उत्सुकता त्याच्या मनात सतत जागी राहते. पान उलटत जाताना जणू डोळ्यासमोर एखादा चित्रपट सुरू असावा, इतक्या प्रवाही आणि दृश्यात्मक पद्धतीने लेखकाने प्रसंग गुंफले आहेत. तुकाराम मुंढे यांचा संपूर्ण जीवनप्रवास वाचकाच्या नजरेसमोर जिवंत उभा राहतो, हे लेखकाच्या लेखनकौशल्याचे मोठे यश आहे. जीवनातील अत्यंत बारीकसारीक तपशील, भावनिक क्षण आणि संघर्षाचे टप्पे लेखकाने ज्या सूक्ष्मतेने टिपले आहेत, त्यामुळे हे पुस्तक केवळ माहितीपर न राहता एक अनुभवसंपन्न वाचनीय साहित्यकृती बनते. हीच गुणवैशिष्ट्ये या पुस्तकाला समाजासाठी आणि विशेषतः स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी बनवतात.




बालपणीच मृत्यूला दोनदा चुकवून आलेले तुकाराम मुंढे हे जीवनाच्या पहिल्याच पावलापासून संघर्षाला सामोरे गेले. या घटनांचा अर्थ शब्दशः "मृत्यूतून वाचणे" इतकाच मर्यादित नाही; त्याहून खोल असा संदेश यात दडलेला आहे. माणसाच्या आयुष्यात येणारी संकटे ही त्यांना मोडण्यासाठी नव्हे, तर त्याच्यातील तग धरण्याची शक्ती सिद्ध करण्यासाठी येत असतात. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा संदेश अत्यंत मोलाचा आहे. अभ्यासाच्या वाटेवर येणारे अपयश, आर्थिक अडचणी किंवा सामाजिक दबाव हे तात्पुरते अडथळे असतात; त्यांना आयुष्याचा अंतिम निकाल मानून खचून जाणे म्हणजे स्वतःच्या क्षमतेवर अन्याय करणे होय. जीवन हे संपण्यासाठी नाही, तर सिद्ध होण्यासाठी दिलेली संधी आहे, हा विचार या प्रसंगांतून ठळकपणे पुढे येतो.

तुकाराम मुंढे यांच्या जडणघडणीत त्यांचे मोठे बंधू अशोक मुंढे यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरली. घरातील तीव्र दारिद्र्य, वडिलांचा शिक्षणाबाबतचा नाईलाजी विरोध आणि तरीही भावाने शिक्षणाची कास न सोडलेली दुर्दम्य इच्छाशक्ती यातून एक वैश्विक सत्य समोर येते. कोणतीही मोठी उंची एकट्याच्या बळावर गाठली जात नाही, तिच्यामागे कुणाचा तरी त्याग, विश्वास आणि मार्गदर्शन असते. समाजाला यातून हा धडा मिळतो की कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्याच्या स्वप्नांसाठी स्वतःचा वाटा झिजवणे हे केवळ कर्तव्य नसून, ती एक सामाजिक गुंतवणूक असते.जिचे फळ केवळ त्या व्यक्तीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण समाजाला मिळते. स्पर्धा परीक्षार्थींनी हे लक्षात ठेवावे की त्यांच्या यशामागे अनेकांचे अदृश्य योगदान असते आणि हे ऋण जाणिवेने जपणे हीच खरी कृतज्ञता होय.

गावात हिंदू-मुस्लिम समाज एकत्र नांदत असल्यामुळे आणि आईच्या संस्कारांमुळे तुकाराम मुंढे यांच्यात लहानपणापासूनच धर्मनिरपेक्षतेचे बीज रुजले. हा तपशील केवळ चरित्रात्मक माहितीपुरता मर्यादित नसून, त्यातून एक महत्त्वाचा सामाजिक संदेश मिळतो देण्यात येतो की,सहिष्णुता ही शिकवून येणारी गोष्ट नसून ती वातावरणातून, आचरणातून झिरपत जाणारी मूल्यसंस्कृती आहे. प्रशासकीय सेवेत जाणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी हा गुण पायाभूत ठरतो. कारण उद्याचा अधिकारी हा संपूर्ण समाजाचे, सर्व धर्मांचे, सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणारा असतो. या दृष्टीने बालपणीच रुजलेली ही मूल्ये पुढील सामाजिक जाणिवेचा भक्कम पाया ठरतात, हे या पुस्तकातून अधोरेखित होते.

तुकाराम मुंढे यांचा यूपीएससीचा प्रवास एकरेषीय यशोगाथा नाही. अनेकदा प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण होऊनही मुख्य परीक्षेत अपयश, मुलाखतीपर्यंत जाऊनही निवड न होणे हे टप्पे या पुस्तकात प्रांजळपणे मांडले आहेत. यातून जो मध्यवर्ती विचार पुढे येतो तो असा की, अपयश हे यशाच्या विरुद्ध टोक नसून यशाच्या प्रवासातील एक अपरिहार्य टप्पा असतो. नेल्सनच्या विचारांनी प्रेरित होऊन द्विधा मनःस्थितीतही लढण्याचा निर्णय घेणे, हे तत्त्व आजच्या स्पर्धा परीक्षार्थींसाठी दीपस्तंभासारखे आहे. वारंवार अपयश येऊनही ध्येयाकडे पाठ न फिरवणे, प्रत्येक अपयशाचे विश्लेषण करून पुढील प्रयत्नात सुधारणा करणे, हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे, असे हे पुस्तक ठासून सांगते.

नोकरीत रुजू झाल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी स्वतःसाठी घालून घेतलेली त्रिसूत्री प्रत्येक अधिकाऱ्यांसाठी दीपस्तंभ ठरते. निर्णय नियमानुसार आहे का? नैतिक दृष्ट्या योग्य आहे का? आणि त्यात लोकहित आहे का? या तीन प्रश्नाचे उत्तरे शोधून तुकाराम मुंढे प्रशासकीय निर्णय घेतात हेच त्यांच्या यशाचे रहस्य लेखकांनी उलगडून दाखविलेले आहे. सत्तेच्या आणि दबावाच्या राजकारणाला सामोरे जातानाही तत्त्वांशी तडजोड न करणे, हा गुण आजच्या प्रशासकीय सेवेतील तरुणांसाठी एक कसोटीचा निकष ठरावा. समाजाला यातून हा संदेश मिळतो की, अधिकारपद हे सत्तेचे साधन नसून जबाबदारीचे ओझे आहे.आणि ते पेलण्यासाठी नैतिक बळ हेच खरे भांडवल असते.

शफी पठाण यांनी "तुकाराम" या पुस्तकातून एका व्यक्तीचे चरित्र नव्हे तर संघर्ष, त्याग, चिकाटी आणि नैतिकता या मूल्यांची एक जिवंत पाठशाळाच उभी केली आहे. सोप्या आणि ओघवत्या भाषेमुळे हे पुस्तक प्रत्येक वाचकवर्गाला आपलेसे वाटते, आणि घटनांच्या तपशिलापेक्षा त्यामागील जीवनदृष्टी अधिक महत्त्वाची ठरते, हीच या पुस्तकाची खरी ताकद आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने आणि सर्वसामान्य वाचकानेही हे पुस्तक केवळ एक कथा किंवा चरित्र म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा आरसा म्हणून वाचावे, असे हे साहित्य आहे.

**- पंचवटी, काटोल जि. नागपूर - ९१४५७७९०५०**

# शासकीय कार्यालयांतील रिक्त पदे भरायला हवीत!

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

सूचना देऊनही शिक्षकांची पदभरती न केल्यामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विभागातील तब्बल २९ महाविद्यालयांवर प्रवेश बंदी घालण्यात आल्याचे वृत्त नुकतेच सर्वत्र प्रकाशित झाले. विद्यार्थ्यांना यामुळे धक्का नक्कीच बसला असेल. पण, देशातील वाढती बेरोजगारी आणि वर्षानुवर्षे रखडलेली पदभरती याचा घोळ पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. आयुष्याची पंचवीस ते तीस वर्षे शिक्षणात घालवून हातात पदव्या घेऊन बसलेली युवा पिढी नोकरीची आस लावून बसली असतांना, सरकार रिक्त पदे भरत का नाहीत? हा प्रश्न मात्र युवकांना त्रासदायक ठरतो.

देशात बेरोजगारी वाढली असल्याची माहिती गेल्या मे महिन्यात सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाद्वारे सादर करण्यात आली होती. खुद्द मंत्रालय जर बेरोजगारी वाढली असल्याचे मान्य करत असेल. तर, विविध विभागात रिक्त असलेल्या पदांना भरले का जात नाही? आणि जर विविध विभागात इतकी पदे रिक्त असतांना जनतेची कामे रखडली गेली नसणार काय? सदर विभागात कार्यरत इतर कर्मचाऱ्यांवर आणि अधिकाऱ्यांवर अधिकचा बोजा येऊन पडला नसेल काय? यावर उपाय म्हणून तासिका तत्त्वावर शिक्षकांना घेणे, अकरा महिन्यांच्या बाँडवर इंजिनियर्स किंवा तंत्रज्ञांची भरती करणे, कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणे कितपत योग्य आहे? या निमित्ताने असे अनेक प्रश्न उपस्थित झाले तर नवल वाटणार नाही. यासाठी सत्तेवर असलेले प्रत्येक सरकार जिम्मेदार आहे, असेच म्हणावे लागेल. इराण आणि अमेरिका तसेच रशिया आणि युक्रेन युद्धाची झळ पोहचून लाखो लोकं बेरोजगार झाल्याचे म्हटल्या जात आहे. आधीच बेरोजगारीचा आकडा फुगीर झाला असतांना त्यात यांची अजून भर पडूनही सरकार रिक्त पदांना भरत नसेल तर काय म्हणावे?

गावपातळीवर प्रशासनाचा कणा मानल्या जाणाऱ्या ग्रामसेवकांची अकोला जिल्ह्यात मोठी कमतरता निर्माण झाल्याची माहिती नुकतीच पुढे आली. अकोला जिल्ह्यात ग्रामसेवकांची तब्बल १९६ पदे रिक्त असल्याचे यात म्हटल्या गेले आहे. जर ग्रामसेवकच उपलब्ध नसल्यावर गावातील कामांचा किती खेळखंडोबा होतो, हे नव्याने सांगणे नाही. मार्च २०२६ च्या एका वृत्तानुसार जम्मू काश्मीर प्रशासनातील तब्बल चाळीस हजार रिक्त असल्याची माहिती मिळाली आहे. राज्याचे अतिरिक्त प्रशासकीय विभागाचे सचिव एम. राजू यांनी दिलेल्या माहितीनुसार यात पावणे चार हजारांपेक्षा अधिक राजपत्रित अधिकारी पदांचा समावेश आहे. जर इतकी पदे वर्षानुवर्षे भरली जात नसेल आणि लोकसंख्या झपाट्याने वाढत असेल तर जनतेच्या कामाची गती कशी असेल, याचा अंदाज सरकारनेच लावायला हवा. मार्च मधीलच एका वृत्तानुसार देशभरातील केंद्रीय विद्यालयांमध्ये ८,६१८ आणि जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये ५, ०८३ पदे रिक्त असल्याची माहिती आहे.

सेवानिवृत्ती, राजीनामा, पदोन्नती, बदली, प्रतिनियुक्ती अशा अनेक कारणांनी पदे रिक्त असतात असे खुद्द केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी एका लेखी प्रश्नाच्या उत्तरादाखल सांगितले होते. मग, ही पदे तात्काळ नाही तर कालांतराने तरी का भरली जात नाहीत? यावर कुणी विचारमंथन करतील काय? जनतेची कामे होत नाही म्हणून ओरड करणारे पुढारी तरी या बाबीकडे लक्ष देतील काय?

आसरा या संघटनेला माहिती अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार नागपुरातील नामांकित शैक्षणिक संस्था असलेल्या व्हीएनआयटीमध्ये तब्बल २५२ पदे रिक्त असल्याची माहिती आहे. काही सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांत रुग्णांना स्ट्रेचरवरून नेण्यासाठी सुद्धा कर्मचारी नाहीत. शासकीय रक्तपेढ्या आणि क्ष किरण सेवा मनुष्यबळाअभावी कधी कधी ठप्प पडून जातात, ही वास्तव परिस्थिती आहे. एकीकडे लोकसंख्या वाढते आहे. शहरे वाढत असल्याची कारणे देऊन आमदार, खासदारांची संख्या वाढविण्यावर भर देण्यात येत असतांना शासकीय कार्यालयांतील या रिक्त पदांकडे कानाडोळा करणे उचित वाटते काय? की फक्त कंत्राटी कर्मचारी भरून निव्वळ लिपापोतीच करायची? तंत्रज्ञान वाढले आहे हे मान्य आहे. मात्र, जिथे मनुष्यबळाची खरेच गरज आहे. तिथे तरी कर्मचाऱ्यांची भरती करायला हवी ना!

वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घाडगे) तालुक्यातील नारा, कन्नमवार आणि सारवाडी येथील प्राथमिक आरोग्य येथील आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, शिपाई आणि परिचारिका यांची नियमित आणि कंत्राटी मिळून ३४ पदे अजून पर्यंत भरली गेली नाहीत. मौदा तालुक्यात पशु संवर्धन विभागातील ८ पदे रिक्त आहेत. इतकेच नाही तर, नागपूर मनपातील विविध प्रवर्गातील तब्बल ८६५९ पदे रिक्त असल्याची माहिती यावर्षीच्या मार्च महिन्यात पुढे आली होती. कसं होईल शहर सुंदर आणि कशा सुटेल सामान्य माणसांच्या समस्या? महाराष्ट्रातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग तसेच राज्य ग्राहक आयोगातील सुमारे ५० टक्के पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. अशी परिस्थिती असल्यावर ग्राहकांनी वेळेवर आणि योग्य न्याय मिळण्याची आशा तरी कशी ठेवावी?

राज्यात गुन्ह्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, पोलिस बळ सुद्धा अपुरे ठरत आहे. आता त्यांच्या मदतीला म्हणून होमगार्ड दिले जात आहेत. मात्र, कारागृह प्रशासनाचा मुख्य कणा समजल्या जाणाऱ्या तुरुंगाधिकारी श्रेणी - २ या पदाची भरती तर गेल्या १२ वर्षांपासून रखडली असल्याचे वृत्त समोर आले आहे. कारागृहांतील तब्बल ७० टक्के पदे रिक्त असल्यावर तुरुंगाचे रक्षण तरी कसे होणार? हा प्रश्न सामान्य जनतेला पडतो, तिथे सरकारला पडत नसावा काय?

जिल्हा परिषद शिक्षणाचा तर नुसता खेळखंडोबा झाल्यासारखा झाला आहे. एकीकडे शिक्षकांना जरी भरमसाट वेतन दिल्या जात असले तरी, दुसरीकडे त्यांच्याकडून अशैक्षणिक कामे करून घेतल्या जात असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यातल्या त्यात अनेक ठिकाणी शिक्षकांची भरती न झाल्याने संपूर्ण शाळाच एका शिक्षकाच्या भरवश्यावर असल्याचे चित्र देखील आहे.

भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतील ८७६ पदे रिक्त असल्याची माहिती आहे. मग, कॉन्व्हेंटच्या शर्यतीत जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता कशी टिकून राहणार? परिणामी पालक वर्ग शासकीय शाळांकडे कानाडोळा करत खासगी शाळांना प्राधान्य देतात आणि मग, आम्हीच सरकारी शाळा बंद झाल्याची बोंब मारत सुटतो. शासकीय कर्मचारी भरतीमुळे सरकारच्या तिजोरीवर ताण पडतो हे खरे असले तरी जिथे आवश्यक त्या शासकीय विभागांत हळूहळू का होईना, सरकारने भरती करायला हवी, निदान तितकी बेरोजगारी तरी कमी होईल आणि नागरिकांची शासकीय कार्यालयातील कामे तरी लवकर होतील, इतकेच.

- ८४१२८७७२२०

# सात्विक अभिव्यक्तीची तरल कलाकृती

लेखिका
मा. विजयाताई ब्राह्मणकर,
(सुप्रसिद्ध कथाकार कादंबरीकार)



"अस्ताव्यस्त वाढत असलेल्या कवितेच्या (?) बाभूळबनात तुझी रचना सात्विक मंगल तुळशीगत प्रसन्न करणारी आहे" ह्या कविवर्य विठ्ठल वाघ यांच्या प्रतिक्रियेप्रमाणे सात्विक अभिव्यक्तीची जाणीव करून देणारा कवितासंग्रह "मन जेव्हा हिरवळले".

मंजूषा कऊटकरांचा कविता संग्रह वाचला, मन हिरवळले आणि गहिवरले सुध्दा. कवितेतील भावनांच्या विविध छटा मंत्रमुग्ध करून जातात.

विमल..या कवितेत कवयित्री म्हणते ..

सांद्र मल्हार कधी तू
कधी निषाद कोमल
व्हावी अमृत अभंग
माझी कविता विमल

अतिशय सुंदर शब्द..अर्था सहित आपल्या आत आत झिरपत जातात.

स्त्रीच्या प्रगतीचा आलेख म्हणजे वटपौर्णिमा.

'उगाच घातली समजुतदारीची पैंजण', 'आता काचून रक्तबंबाळ झाली आहेत पावलं',
'तडजोडीची वेल',
'दाणा गर्भार झालाय',
'वार्ता आणली वायार्ने',
'चला ऐहिका पार
कर उघडे दार
कर रिकामे घर
संसाराचे',
देही नाजूक भास
काही उधार श्वास..

अशी सुंदर शब्दकळा या कविता संग्रहाच्या पानापानातून आणि पानावरच्या ओळी ओळीत दिसून येते.

अवकाळी पाऊस संघर्ष करायला शिकवतो आणि भोगलेल्या व्यथा, वेदना विसरायलाही शिकवतो.

गावाकडचे रस्तेमध्ये सबंध गाव उभं करण्याचं सामर्थ्य कवयत्रिच्या लेखणीत आहे .

मंजूषा "साद"..मन हेलावून टाकते. अस्वस्थ करते. कवयित्रीच्या कवितांमधून अनेक विषय सहज डोकावतात.

शिवारात पाहू उभा श्रीहरी..

या ओळी सावता माळ्याची आठवण करून देते. मंजूषाची कविता डोळ्यासमोर चित्र उभं करते, स्त्रीचे वेदना तिच्या कवितेतून उमटते.

बाई तुझे जिणे टांगले आभाळी..

किती सुंदर कल्पनाविलास.. मातीत रूजण्याचे मोल कवयित्री सांगते तेव्हा तिच्या अंतर्मनातील वेदना शब्दातून प्रगट होतात, ते दुःख पुन्हा एकाच स्त्रीचे नाही तर समस्त स्त्री वगार्चे दुःख तिने आभाळी टांगलेले आहे पण भोग सुद्धा सुटता सुटत नाही.

कविता सहजपणे उतरलेल्या आहे कुठेही शब्दांची ओढाताण नाही. पैलतीराचं बोलावणं आलं की सारे बंध कितीही करकचून बांधलेले असले तरी बंध सैल करावेच लागतात तिथे कुणाचा उजर चालत नाही.. चल म्हटले की निघायचं कारण पैल तिरी सावळा आपली वाट बघत असतो आणि आपण निघतो आहे ऐल तीराकडून पैल तीराकडे.

**विजया ब्राह्मणकर,**
**७८८८२८६०७२**

साहित्यातील पहिलं पाऊल
- मन जेव्हा हिरवळले" (काव्यसंग्रह)
- परीस प्रकाशन पुणे
- प्रस्तावना :- कविवर्य मा. श्री अशोक नायगावकर
- शुभेच्छा :- कविवर्य मा. प्रा. श्री अशोक बागवे
- शुभेच्छा :- कविवर्य मा. श्री विठ्ठल वाघ
- पृष्ठ :- ९६
- सहयोग मूल्य:- १५०
- कवयित्री :- मंजूषा संजय कऊटकर




कवयित्रीला निसर्ग खुणावतो. यात उमलणं आहे. फुलणं आहे. आणि चुरगळणं सुध्दा आहे. सावत्याचा मळा आहे. जनीची मदत करणारा विठूराया आहे. तुकोबाची इंद्रायणी आहे आणि अंतरात दरवळणारा विठ्ठल नामाचा सुवास आहे.

यात प्रेम आहे भक्ती आहे. व्यथांना शब्दांचा साज आहे. प्रेमाचं मधाळपण आहे. ओव्या, अभंगांना भक्तीचा सुगंध आहे. कवयित्रीचे कवितेच्या क्षेत्रात पहिलेच पाऊल अगदी दमदारपणे पडलेले आहे. साध्या, समंजस व्यक्तिमत्त्वाच्या धनी असलेल्या मंजूषा या कवयित्रीचे प्रांजळ मन कवितेमध्ये जागोजागी दिसून येते.

मंजूषा.. मन जेव्हा हिरवळले.. यासाठी खूप खूप अभिनंदन! पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

**- मो. ८००७१८९५०९**

थोडक्यात

## मनपा करणार १ लाख ७५ हजार तिरंगा झेंड्यांचे वाटप : महापौर निता ठाकरे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून "हर घर तिरंगा" ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवणे, ही सदर उपक्रम राबविण्यामागील मूळ कल्पना आहे. मनपाद्वारे शहरात १ लाख ७५ हजार तिरंगा झेंड्यांचे वाटप करणार आहे, नागरिकांनी देखील मोठ्या संख्येत अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे उपस्थित होत्या.

सन २०२६ मध्ये सुद्धा सदर मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यानुषंगाने सन २०२६ मध्ये हर घर तिरंगा मोहीम केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे दि. ९ ऑगष्ट पासून राबविण्याचे निर्देश राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे. मोहिमेच्या अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र व राज्य शासनाने निर्गमित मार्गदर्शक सुचनांचे पालन करून मा. आमदार निधी व मनपा निधीतून शहराकरीता १ लाख ७५ हजार तिरंगे झेंडे वाटप करणार आहे. त्यात मनपा शाळा विद्यार्थी आर्थिक दुर्बल भागात झेंडेच्या वाटप करणार आहे. इतर कार्यक्रम खालील वेळापत्रकाप्रमाणे नमुद सर्व उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याचे महापौर यांनी सांगितले.

## जात पडताळणी समितीच्या कामात कोणीच हस्तक्षेप करू शकत नाही !

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नार्को टेस्ट करण्यास माझी पूर्ण संमती

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

जात पडताळणी समितीला अर्धन्यायिक अधिकार आहेत; त्यांच्या कामकाजात सरकार किंवा कोणत्याही मंत्र्याला हस्तक्षेप



करण्याचा अधिकार नाही, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. "माझी नार्को टेस्ट करण्यास माझी पूर्ण संमती आहे," असे सांगून ते म्हणाले, जात पडताळणी समितीचा निर्णय अंतिम निर्णय नसतो. आपल्यावर अन्याय झाला असे वाटले तर, उच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. महसूल मंत्री बावनकुळे मुंबई येथे माध्यमाशी बोलत होते. ते म्हणाले, मनोज जरांगे पाटीलांच्या आरोपांना मी प्रत्युत्तर देणार नाही. मी वस्तुस्थिती सांगेन. तीच सांगतो आहे. मी महसूल मंत्री असलो तरी जात पडताळणी समितीला फोन करून निर्णय बदलण्यास सांगू शकत नाही. समितीचे स्वतंत्र अर्धन्यायिक अधिकार आहेत. त्यामुळे कोणत्याही मंत्र्याच्या सांगण्यावरून जात प्रमाणपत्रे रद्द झाली, असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. कोणाची प्रमाणपत्रे रद्द झाली; तो डेटा मिळतो.

जात पडताळणी समितीच्या निर्णयांबाबत शंका असल्यास न्यायालयीन मार्ग उपलब्ध असून, संबंधितांनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## महापौरांनी केली कळमना मार्केट यार्डची पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कळमना बाजारात कचरा कुजून त्याची सर्वत्र दुर्गंधी पसरते. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. तसेच पर्यावरणाची देखील हानी होत आहे. याबद्दल नाराजी व्यक्त करीत परिसरातील कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात यावी असे सक्त निर्देश महापौर निता ठाकरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच लकडगंज झोनमधील कऱ्हाळे नगर, भरतवाडा परिसरातील नाग नदीची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे ही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, कळमना येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसराची महापौर निता ठाकरे यांनी गुरुवारी (ता. ०६) पाहणी केले. पाहणी दरम्यान मनपाचे सत्तापक्ष नेते श्री नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपिन, अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती श्रीमती मनीषा अतकरे, नगरसेवक श्री प्रदीप पोहणे, उपायुक्त श्री. राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता श्री. सचिन रक्षमवार कृषी उत्पन्न बाजार समिती प्र.उपसचिव श्री. रमेश चवरे, श्री. धनराज बागडे उपस्थित होते.

कळमना बाजार येथील डंपिंग यार्डमध्ये भाजीपाला व फळांचा मोठ्या प्रमणात सेंद्रिय कचरा साचलेला असून तो कुजल्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. यामुळे जवळपासच्या वस्तींमधील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर साचलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने तातडीने विल्हेवाट लावण्याचे निर्देश महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी दिले. यासोबतच भविष्यात अशा प्रकारे कचरा साचणार नाही, यासाठी दीर्घकालीन व शास्त्रोक्त नियोजन करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. तसेच सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र बोरकर यांनी याठिकाणी यापुढे नवीन कचरा टाकला जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# गणेशोत्सव मंडळांना एक खिडकी प्रणालीद्वारे परवानग्या मिळणार

### सर्व ना हरकत प्रमाणपत्रे ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होणार, महापौर निता ठाकरे यांनी घेतला गणेशोत्सवाचा पूर्वतयारीचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक असलेला गणेशोत्सव यावर्षी देखील शहरात अत्यंत उत्साहाने साजरा करण्यासाठी तसेच गणेशोत्सव मंडळांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता मनपासह नासुप्र, पोलीस, वाहतूक विभाग, धमार्दाय आयुक्त कार्यालयाने घ्यावी. गणेशोत्सव मंडळांना ना हरकत प्रमाणपत्रे व परवानग्या ऑनलाईन पद्धतीने सुलभेतेने एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

पुढील महिन्यात होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. ६) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात घेतला. यावेळी स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी व श्रीमती विनीता शाहू, मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित, अतिरिक्त आयुक्त श्री. मिलिंद मेश्राम, मनपाच्या वैद्यकीय व आरोग्य विशेष समिती सभापती श्रीमती मनीषा अतकरे, पोलीस उपायुक्त (विशेष शाखा) श्री. रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. नितीन बने, मनपाचे उपायुक्त श्री. राजेश भगत, उपायुक्त श्री. गणेश राठोड, मुख्य स्वच्छता अधिकारी, डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह मनपाच्या विविध विभागाचे प्रमुख तसेच नासुप्र, धमार्दाय आयुक्त, वाहतूक पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी अतिरिक्त आयुक्त श्री. मिलिंद मेश्राम यांनी गणेशोत्सवाच्या संदर्भात माहिती दिली व पीपीटीच्या माध्यमातून गणेशोत्सव साजरा करण्याच्या संदर्भात मनपाने केलेल्या तयारीची माहिती दिली. महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना परवानग्या घेताना त्रास होणार नाही तसेच नागरिकांनाही या काळात त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश दिले. गणेशोत्सव मंडळांसाठी आवश्यक परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे, एक खिडकी योजनेद्वारे उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात मनपाने तयारी केलेली आहे. मनपाच्या मुख्यालयासह प्रत्येक झोनमध्ये सुद्धा गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्यासाठी व्यवस्था करण्यात येणार आहे. ना हरकत प्रमाणपत्रांसाठी पोलीस विभाग, वाहतूक विभाग, धमार्दाय आयुक्त कार्यालयातील कर्मचारी झोन मध्ये हजर राहिल्यास गणेशोत्सव मंडळाच्या स्वयंसेवकांना त्रास होणार नाही, असेही महापौरांनी यावेळी सुचविले. त्याचप्रमाणे महाल भागात गणेश मूर्तीच्या खरेदीसाठी होत असलेली गर्दी कमी करण्यासाठी शहरातील इतर भागातील मैदानांमध्ये विक्रीची व्यवस्था करण्यात येईल, असेही महापौरांनी सांगितले. गणेशोत्सव मनपा व पोलीस विभागाने समन्वय साधून याकाळात व्यवस्था चोख ठेवावी, असे निर्देश महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी दिले.

**ड्रोनद्वारे गर्दीवर नियंत्रण : नरेंद्र (बाल्या) बोरकर**

यावेळी सूचना करताना सत्ता पक्षनेता श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी विसर्जन स्थळी टॉवर उभारून ड्रोनद्वारे शुटिंग करण्याची सूचना केली. यामुळे त्या ठिकाणी गर्दीवर नियंत्रण ठेवणे सुलभ होणार आहे. हे ड्रोन कॅमेरे नियंत्रण कक्षाला जोडले जाणार आहे. यासाठी पोलिस विभागाने टॉवर एक पोलीस शिपाई तैनात करावा, अशी सूचना त्यांनी केली.

अनेक ऑनलाईन परवानगी मिळते परंतु प्रमाणपत्रांवर पोलीस वाहतूक विभागाचे अधिकारी स्वाक्षरी करीत नसल्याने गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांना वारंवार पोलीस ठाण्यात जावे लागते, अनेकदा तीन-चार दिवस स्वाक्षरी होत नाही. यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्तांनी योग्य निर्देश द्यावे, अशी सूचना सत्तापक्ष नेते श्री. बोरकर यांनी केली. महाल भागातील बडकस चौक व अग्रसेन चौकात गणेश मूर्तीच्या खरेदीच्यावेळी गर्दी होत असल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत राहत नाही. यासंदर्भात वाहतूक विभागाने योग्य खबरदारी घ्यावी, असेही श्री. बोरकर यांनी सुचविले.

**आगीपासून संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करा: विश्वास नांगरे पाटील**

पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांनी गणेशोत्सव मंडळांना सर्व परवानग्या तात्काळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. त्याचप्रमाणे यावेळी त्यांनी मोठ्या गणेशोत्सव मंडळांना आगीपासून संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करण्याच्या सूचना केली.

अनेकदा आग लागल्यामुळे मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक बाधित होण्याची शक्यता असते. गणेशोत्सव साजरा करताना गर्दीवर नियंत्रण, घातपात होणार नाही, याची खबरदारी व वाहतुकीचे नियंत्रण अशा तीन बाबी विचारात घेण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे गणेशोत्सव मंडळाने ध्वनी प्रदूषण होणार नाही याकरिता आवाजावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असल्याचे सांगत यासंदर्भात गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देऊन अधिक आवाजाने होणाऱ्या दुष्परिणामाबाबत संवेदनशील करण्याची आवश्यकता असल्याचे श्री. नांगरे पाटील यांनी सांगितले.

# राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेची राज्यस्तरीय समिती स्थापन

### शासकीय पड जमिनींवर चारा व बांबू उत्पादनाला वेग मिळणार, महिला बचत गटांना रोजगाराची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजने अंतर्गत शासकीय पड जमिनी भाडेपट्ट्याने देऊन त्यावर चारा व बांबू लागवड करण्याच्या धोरणावर प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठी महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय 'राज्यस्तरीय समिती' गठीत करण्यात आली आहे.

या समितीमध्ये ११ सदस्य या विधानसभा आणि विधानपरिषदेतील ११ महिला आमदार, तसेच प्रत्येक महसुली विभागातील दोन महिलांचा समावेश होणार असून महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव हे सदस्य सचिव म्हणून काम करणार आहेत. महसूल विभागाने याबाबतचा निर्णय घेतला असून यासंदभार्तील अधिकृत शासन निर्णय शुक्रवार ( दि. ३१ जुलै ) रोजी जारी करण्यात आला आहे. शासकीय पड जमिनींचा योग्य वापर व्हावा आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत पात्र महिला, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट, उमेद/माविम अंतर्गत येणारे महिला बचत गट, महिला सेवा सहकारी संस्था तसेच ग्रामसंघ यांना शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहेत. यामुळे महिलांना स्थानिक पातळीवर रोजगाराची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

**राज्यस्तरीय समितीची रचना पुढीलप्रमाणे**

या संपूर्ण योजनेवर धोरणात्मक निर्णय घेणे व संनियंत्रण ठेवण्यासाठी ही राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

महसूलमंत्री- अध्यक्ष

विधानसभा व विधानपरिषदेच्या ११ महिला सदस्य - सदस्य

प्रत्येक महसूल विभागातील २ याप्रमाणे महसूल मंत्र्यांनी नामनिर्देशित केलेल्या

१२ अशासकीय महिला सदस्य - अशासकीय महिला सदस्य

अपर मुख्य सचिव (महसूल) - सदस्य सचिव

**समितीची प्रमुख कार्यकक्षा व जबाबदाऱ्या**

आढावा घेणे : या योजनेअंतर्गत जमिनी भाडेपट्ट्याने देण्याच्या कार्यवाहीचा दर ३ महिन्यांनी राज्यस्तरावर आढावा घेणे.

संनियंत्रण : जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत राबवल्या जाणाऱ्या जिल्हा व तालुकास्तरीय समित्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

अडचणींचे निवारण : योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या प्रशासकीय व धोरणात्मक अडचणी सोडवणे.

धोरणात सुधारणा : चारा, बांबू, नर्सरी व अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यकतेनुसार धोरणात सुधारणा सुचवणे.

## दिव्यागांना नि :शुल्क जयपूर फूट साहित्य वाटप शिबीर ७ ऑगस्टपासून

### १० ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत समारोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती, जयपूर, जिल्हा परिषद नागपूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधीर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना निः शुल्क जयपूर फूट साहित्य व साधने मोजमाप व वाटप शिबिराचे आयोजन शुक्रवारी ७ ते रविवार १० ऑगस्ट दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आहे. शिबिराचा समारोपीय कार्यक्रम सोमवार १० ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महापौर निता ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडेल. उद्घाटन समारंभाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्यासह खासदार माया इवनाते, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर आडबाले, आमदार परिणय फुके, आमदार कृपाल तुमाने, आमदार संजय भेंडे, आमदार राजीव पोद्दार, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार विकास ठाकरे, आमदार मोहन मते, आमदार समीर मेघे, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार डॉ. आशीष देशमुख, आमदार संजय मेश्राम, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपीन, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांची उपस्थिती राहणार आहे.

# सौर ऊर्जेच्या आधारे कृषी सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल जागतिक पातळीवर उपयुक्तः अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० आणि मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याने सौर ऊर्जेच्या आधारावर कृषी सिंचनात लक्षणीय यश मिळविले आहे. त्यासोबत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासोबतच रोजगारनिर्मितीला मदत होत आहे. सौरऊर्जा वापराचे महाराष्ट्राचे हे मॉडेल देशातील अन्य राज्यांसोबतच जागतिक पातळीवरील विकसनशील राष्ट्रांसाठी उपयुक्त ठरले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी मुंबईत केले.

महावितरण, एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) आणि मित्रा यांनी कृषी सिंचनासाठी



सौरऊजेर्चा वापर या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना लोकेश चंद्र बोलत होते. यावेळी मित्रा या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, कृषी सल्लागार सुधीरकुमार गोयल, महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार उपस्थित होते. एआयआयबीचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी प्रत्युष मिश्रा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी चर्चासत्रास उपस्थित होते.

लोकेश चंद्र म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत ऊर्जावापरात नवीकरणीय उजेर्चा वाटा किमान ५० टक्के असावा, असे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिवसा व भरवशाचा वीज पुरवठा करण्यावर भर देतानाच शेतीसाठी नवीकरणीय ऊर्जेचा पुरवठा करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने मार्च २०२७ अखेर राज्यातील कृषी सिंचनासाठी शंभर टक्के वीज पुरवठा सौरऊर्जेद्वारे करण्याचे नियोजन केले आहे.

त्यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत ११ लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून त्यामुळे ११ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असून ४० लाख एकर शेतीमध्ये सिंचनाची सुविधा निर्माण झाली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत आतापर्यंत सहा हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी सिंचनासाठी सौर ऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची भरवशाची सुविधा मिळण्यासोबतच हवामान बदलाच्या विपरित परिणामांचा सामना करण्यास मदत होते.

ते म्हणाले की, सिंचनासाठी सौर ऊर्जा वापरण्यामुळे खर्चात मोठी बचत होते तसेच पर्यावरणपूरक ऊजेर्चा वापर होतो. ब्राझिल येथे जागतिक हवामान परिषदेत महाराष्ट्राचे सिंचनासाठी सौर ऊर्जा वापराचे मॉडेल मांडल्यानंतर त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. विकसनशील देशांमध्ये या मॉडेलचा वापर करण्याबाबत महावितरणचा इंटरनॅशनल सोलर अलायन्ससोबत सामंजस्य करार झाला आहे. देशातील इतर राज्ये महाराष्ट्र मॉडेलचे अनुकरण करत आहेत. एआयआयबीच्या माध्यमातून इतर विकसिनशील राष्ट्रांमध्ये महाराष्ट्र मॉडेल राबवता येईल.

लोकेश चंद्र यांनी सांगितले की, सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. एका महिन्यात ४५,९११ सौर पंप बसवून राज्याने गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. त्यासोबत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या दोन योजनांमुळे ग्रामीण भागात फार मोठी आर्थिक गुंतवणूक होत असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट होत आहे. योजनेची अंमलबजावणी झालेल्या क्षेत्रातील अभ्यासात या दोन योजनांचा ग्रामीण भागात जीवनमान उंचावल्याचे दिसत आहे.

प्रवीण परदेशी म्हणाले की, कृषी पंपांना ऊर्जा पुरविण्यासाठी कोळशाच्या वापरापासून नवीकरणीय ऊर्जेच्या वापराच्या परिवर्तनाच्या बाबतीत महाराष्ट्राने चांगले यश मिळविले आहे. ह्यमित्राह्न या संस्थेने राज्यातील कृषी पंपांसह विविध बाबींची माहिती एकत्रित केली असून तिचा उपयोग अचूक धोरणात्मक निर्णयासाठी होत आहे.

मुख्यमंत्र्यांचे जलधोरण सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी पाणी व संबंधित संसाधनांची माहिती व व्यवस्थापन (वारिम्स) या संदर्भात निर्णयप्रक्रियेत जीआयएस प्रणालीचा वापर याविषयी सादरीकरण केले. भूजल साठा ध्यानात घेऊन ऊजेर्चा वापर करावा, सौरऊर्जेच्या आधारे सिंचन करताना त्याचा जलपुनर्भरणाशी संबंध जोडावा आणि स्थानिक पातळीवरील पाणीवापर संस्थांना सबळ करावे अशा शिफारशी त्यांनी केल्या.